cmyk

## संपादकीय

### तर भविष्यात शिंदेंची कोंडी...!

एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पक्षाला देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये सहभागी होणे अपरिहार्य आहे हे अगदी निवडणुकीचे निकाल लागले त्या दिवशीपासूनच स्पष्ट झाले होते. अजित पवारांनी तर लगेच तडजोड मान्य करीत उपमुख्यमंत्री म्हणून आपण समाधानी असल्याचे सांगितले. खात्यासंबंधीच्या वाटाघाटी नंतर होतीलच, परंतु उपमुख्यमंत्री म्हणून आपण शपथ घेणार ही त्यांची अगदी सुरुवातीपासून भूमिका राहिली.

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### विधानसभा अध्यक्षपदासाठी एकट्या नार्वेकरांचा अर्ज

मुंबई: भाजपाचे आमदार तथा माजी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा विधानसभा अध्यक्ष पदासाठीचा अर्ज रविवारी विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांच्याकडे सादर केला. वास्तविक पाहता मागील अडीच-तीन वर्षे विधानसभेच्या अध्यक्ष पदावर काढलेल्या राहुल नार्वेकर यांना यावेळी राज्य मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम करायचे होते. तशी इच्छाही यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाच्या काही नेत्यांकडे बोलून दाखविली होती. मात्र गतवेळी भाजपा निष्ठ म्हणून केलेल्या कामाची पोचपावती म्हणून पुन्हा राहुल नार्वेकर यांना विधानसभा अध्यक्ष पदाची संधी देण्याचा निर्णय भाजपाने घेतला.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२२६ | सोमवार, दि.०९ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शेतकरी आंदोलकांवर फोडल्या अश्रुधुराच्या नळकांड्या

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**विविध मागण्यांसाठी दिल्लीच्या शंभू सीमेवर आंदोलनाला बसलेल्या शेतकऱ्यांनी रविवारी ८ डिसेंबर रोजी दिल्लीत कूच करण्यासाठी 'दिल्ली चलो' मार्चचे आयोजन केले होते. पण हरियाणा पोलिसांनी शेतकऱ्यांना सीमेवरच रोखले. आंदोलक शेतकरी व पोलिसांच्यात बाचाबाची झाली. तसेच पोलिसांनी आंदोलकांवर अश्रूधूराच्या नळकांड्या फोडल्या. यामुळे शेतकरी माघारी फिरत आहेत.**



सकाळी मार्च सुरु होण्याआधी पोलिसांनी आंदोलकांची ओळखपत्रे तपासण्यास सुरवात केली. दिल्लीकडे जाण्याची मागणी शेतकरी करत होते पण पोलिसांनी त्यांना सीमेवरच रोखून धरले. आंदोलक व पोलिस यांच्यात बाचाबाची सुरु झाली. काही शेतकरी बॅरीकेट तोडण्याचा प्रयत्न करू लागले पण पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडून शेतकऱ्यांना पांगवले. यामध्ये रेशम सिंग नामक शेतकरी जखमी झाला. यानंतर आंदोलक संतप्त झाले ते पुन्हा दिल्लीकडे कूच करु लागले. परत तिन अश्रुधूराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. यामध्ये तीन शेतकरी जखमी झाले. त्यानंतर शेतकऱ्यांना शांत करण्यासाठी पोलिसांनी शेतकऱ्यांवर फुले टाकण्यास सुरवात केली. यानंतर शेतकरी नेते सरवण सिंह पधेर हे त्याठिकाणी आले. पान २ वर

### आश्वासनपूर्ती नाही म्हणून शेतकरी रस्त्यावर – आपची टीका

*भाजपने शेतकऱ्यांना खोटी आश्वासने दिली. ती पूर्ण केली जात नाही म्हणून आमचा अन्नदाता रस्त्यावर आहे. त्यांच्याशी चर्चा करावी असे म्हणत आम आदमी पक्षाने केंद्र सरकारवर टीका केली. शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाच्या प्रवक्त्या प्रियंका कक्कड म्हणाल्या की, देशाचा अन्नदाता आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरला, हे दुःखदायक आहे. शेतकऱ्यांना आंदोलन करण्यापासून रोखले जात आहे. भाजप सरकारने शेतकऱ्यांशी चर्चा करावी, असेही त्या म्हणाल्या.*

## रडगाणं थांबवा अन् विकासाचं गाणं गा–एकनाथ शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**



निवडणुकीत जेव्हा महाविकास आघाडीच्या बाजूने निकाल लागतो तेव्हा ईव्हीएम मशीन चांगल्या असतात. पण जेंव्हा निकाल विरोधात लागतो तेंव्हा मविआच्या नेत्यांकडून ईव्हीएम घोटाळ्याची ओरड सुरु होते. महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना चारीमुंड्या चित केले आहे. त्यामुळे आता त्यांनी ईव्हीएमचे रडगाणे न गाता विकासाचे गाणे गायला पाहिजे, असे वक्तव्य राज्याचे नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते रविवारी विधिमंडळाच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

यावेळी एकनाथ शिंदे यांनी मविआच्या नेत्यांवर सडकून टीका केली. झारखंडमध्ये मतदान झाले, कर्नाटकात मतदान झाले, लोकसभा निवडणुकीत मतदान झाले, प्रियांका गांधी जिंकल्या. पण जेव्हा पराभव झाला तेव्हा मविआने ईव्हीएम घोटाळा म्हणायला सुरुवात केली. पान २ वर

# पंकजा मुंडेंनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट

### मराठवाड्यातील दुष्काळ आणि स्थलांतरावर चर्चा, फडणवीसांकडून विशेष लक्ष देण्याचे आश्वासन

**मुंबई । प्रतिनिधी**

**भाजप नेत्या आणि आमदार पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रविवारी भेट घेतली. या भेटीत पंकजा मुंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मराठवाड्यातील दुष्काळावर चर्चा केली आहे. तसेच मराठवाड्यातून होणाऱ्या स्थलांतरावर देखील चर्चा केली आहे. याबाबतची माहिती पंकजा मुंडे यांनी त्यांच्या फेसबुक आणि ट्वीटरवर पोस्ट करत दिली आहे.**



ट्वीटर आणि फेसबुकवर केलेल्या पोस्टमध्ये पंकजा मुंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. तसेच या भेटीत मराठवाड्याच्या मुद्द्यांवर, विशेषत: दुष्काळ निर्मूलन आणि काही भागातील बेरोजगारी सोडवण्याच्या मुद्यावर चर्चा झाल्याची माहिती पंकजा मुंडे यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या मागास भाग आणि बीडमधील स्थलांतरित कामगारांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देण्याचे आश्वासन यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती देखील पंकजा मुंडे यांनी दिली आहे. दरम्यान, पुढच्या ४ ते ५ दिवसात महाराष्ट्र सरकारच्या मंत्रीमंडळाचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. यामध्ये मंत्रीपद मिळवण्यासाठी अनेक नेते इच्छुक आहेत. भाजपच्या संभाव्य मंत्र्यांची यादी देखील समोर आली आहे. यामध्ये मराठवाड्याला भाडपकडून दोन मंत्रीपदे मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये पंकजा मुंडे यांचे नाव आघाडीवर आहे. तसेच अतुल सावे यांना देखील मंत्रीपद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पंकजा मुंडेंच्या यांची मंत्रीमंडळात वर्णी लागणारच असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. मात्र, देवेंद्र फडणवीस पान २ वर

# जिंकलेल्यांना स्वत:च्या विजयावर विश्वास नाही

### उद्धव ठाकरे यांचा खोचक टोला, भाजपा आणि मनसेवर टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीत राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने १०० हून अधिक ठिकाणी उमेदवार उभे केले. इतकेच नव्हे तर माहिममधून त्यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांनाही पहिल्यांदाच उमेदवारी दिली. परंतु मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा एकही उमेदवार निवडूण आला नाही. त्यातच भाजपाने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या तरी विजयाचा उत्सव साजरा केला जात नसल्यावरून शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि मनसे वर टीका केली. मनसेच्या घाटकोपर येथील काही कार्यकर्त्यांनी रविवारी शिवसेना उबाठा पक्षात प्रवेश केला. त्यावेळी उद्धव ठाकरे बोलत होते.



उद्धव ठाकरे म्हणाले की, काही जणांनी राजकिय पक्षाची स्थापना केली. मात्र पक्ष स्थापन करताना काही व्हिजन आणि विचार असावा लागतो. मात्र मला पान २ वर

## मारकडवाडी ग्रामस्थांचा शरद पवारांच्या उपस्थितीत ईव्हीएम विरोधात एल्गार !

### ईव्हीएम हटाव, देश बचाव या कार्यक्रमात सहभागी

**सोलापूर । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुंकाच्या मतदान प्रक्रियेला आव्हान देत, सोलापूरातील मारकडवाडी या गावातील गावकऱ्यांनीच मतपत्रिकेवर मतदान प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. परंतु प्रशासनाने दडपशाही करत ही प्रक्रिया थांबवली. यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी (दि.८) मारकडवाडी येथे भेट दिली. दरम्यान ईव्हीएम हटाव, देश बचाव या कार्यक्रमात ते सहभागी झाले.**



सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी गावात ईव्हीएम विरोधी कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस-एससीपीचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले, ''इथे येण्यापूर्वी मी ऐकले की इथल्या लोकांनी तुम्हाला मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायची आहे, अशी वेगळी भूमिका घेतल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. कारण तुम्हाला निकालावर विश्वास नव्हता. हे आश्चर्यकारक आहे. मला तुम्हाला सांगायचे आहे की, तुम्ही माझ्याकडे ज्या काही तक्रारी सुपूर्द केल्या आहेत, त्या आम्ही निवडणूक आयोग आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे पाठवू, असा विश्वास त्यांनी मारकडवाडीतील जनतेला दिला. तसेच या कार्यक्रमादरम्यान ईव्हीएमवर निवडणूक नको, ती मतपत्रिकेवर व्हावी, असा ठराव देखील एकमताने करण्यात आला. पवार पुढे म्हणाले, ''निवडणुका होतात काही जिंकतात पान २ वर

#### भारतात मतपत्रिकेवर निवडणुका का नाहीत?

''अमेरिका, इंग्लंड आणि अनेक युरोपीय देश इव्हीएमवर नव्हे तर मतपत्रिकांवर निवडणुका घेत आहेत. जेव्हा संपूर्ण जग निवडणुका मतपत्रिकेवर घेत आहेत. तर भारतात मतपत्रिकेवर, निवडणुका का नाहीत?'', असा सवाल राष्ट्रवादी-एससीपी अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारला केला आहे.

## समझोता करण्यासाठी गेलेल्या तरुणावर तलवारीने प्राणघातक हल्ला

### तिघांवर गुन्हा; अंबाजोगाई तालुक्यातील घटना

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**जुन्या वादावर बोलून समझोता करण्यासाठी गेलेल्या तरुणावर तिघा भावांनी तलवार, लाठ्या-काठ्यांनी प्राणघातक हल्ला चढविला. याप्रकरणी तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. विनोद वसंत ढवारे (वय ३०, रा. पोखरी, ता. अंबाजोगाई) असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.**

विनोदच्या फिर्यादीनुसार त्याच्या गावातील सुरज संतोष वाघमारे याने विनोदचे भाऊ महादेव, शंभू आणि आकाश यांच्या विरोधात अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली होती. सदर वाद चर्चेतून सामोपचाराने पान २ वर

## राज्यघटनेची पुस्तिका हाती घेत काँग्रेसच्या आमदारांची शपथ

### दुसऱ्या दिवशी १०६ सदस्यांनी घेतली शपथ




**मुंबई । प्रतिनिधी**

**काँग्रेसचे नाना पटोले, नितीन राऊत यांच्यासह अन्य काँग्रेस खासदारांनी राहुल गांधी यांच्या प्रमाणे हाती राज्यघटनेची प्रत ठेवून विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.**

विधानसभेच्या विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास निळकंठ कोळंबकर यांनी ११४ पैकी १०६ नवनिर्वाचित आमदारांना विधानसभेच्या सदस्यपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सदस्य उपस्थित होते. यावेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्व आमदारांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. गैरहजर पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ डिसेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४.०० क्विंटल | २,७१८ | २,७२० | २,७१९ |
| ज्वारी/हायब्रिड: २०.५० क्विंटल | २,१५१ | २,९३० | २,४६३ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २२.०० क्विंटल | ६,२०१ | ६,८५० | ७,५०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: १४.०० क्विंटल | २,२०० | ३,१०१ | २,४९७ |
| मुग : २.५० क्विंटल | ७,३०१ | ७,३०१ | ७,३०१ |
| सोयाबीन: ३४५.५० क्विंटल | ३,५०० | ४,२८० | ४,०९३ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |

# मारकडवाडीप्रमाणे राज्यातील अनेक गावामध्ये बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यासाठी ग्रामसभेचे ठराव!

### निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालयाने दखल घ्यावी, नाना पटोले यांची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील नव्या सरकारबद्दल जनतेच्या मनात संभ्रम असून हे सरकार आपल्या मताचे नाही ही जनभावना राज्यात तीव्र बनली आहे. मारकडवाडीतच नाही तर राज्यातील प्रत्येक गावाची हीच भावना आहे. बॅलेट पेपरवरच मतदान घ्यावे, अशी मागणी जनतेतूनच जोर धरत असून ग्रामसभा तसे ठराव पास करत आहेत. निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालय या दोन संस्थांनी या जनभावनेची दखल घ्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.**




#### सरकारने विधिमंडळाची परंपरा पाळावी

नाना पटोले म्हणाले की, विधानसभा अध्यक्षपद बिनविरोध करणे तसेच उपाध्यक्षपद विरोधी पक्षाला देणे ही महाराष्ट्राच्या विधिमंडळाची परंपरा आहे. दिल्ली विधानसभेत भाजपाचे फक्त तीन सदस्य असतानाही आम आदमी पक्षाने भाजपाला विरोधी पक्षनेतेपद दिले. मविआच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन महाविकास आघाडीला विरोधी पक्ष नेते पद देण्यासंदर्भात चर्चा केली. सरकार त्यावर सकारात्मक विचार करेल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

विधिमंडळ परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, माझे मत मी दिलेल्या उमेदवारालाच जाते का, यावर जर मतदारांना शंका असेल तर त्याचे समाधान झाले पाहिजे. मारकडवाडीतील लोकांनी बॅलेटपेपरवरील मतदानासाठी मॉक पोलिंग घेण्याचा निर्धार केला होता पण निवडणूक आयोग, पोलीस प्रशासनाच्या मदतीने सरकारने त्यांची मुस्कटदाबी केली, पान २ वर

cmyk

अग्रलेख

# तर भविष्यात शिंदेंची कोंडी...!

एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पक्षाला देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये सहभागी होणे अपरिहार्य आहे हे अगदी निवडणुकीचे निकाल लागले त्या दिवशीपासूनच स्पष्ट झाले होते. अजित पवारांनी तर लगेच तडजोड मान्य करीत उपमुख्यमंत्री म्हणून आपण समाधानी असल्याचे सांगितले. खात्यासंबंधीच्या वाटाघाटी नंतर होतीलच, परंतु उपमुख्यमंत्री म्हणून आपण शपथ घेणार ही त्यांची अगदी सुरुवातीपासून भूमिका राहिली.

एकनाथ शिंदे यांनी मात्र तुटते की काय असे वाटे पर्यंत ताणून धरले. आताही ते मंत्रीपदावरून आडून बसलेले आहेत, मात्र त्यांना आता भाजप भीक घालेल असे वाटत नाही. शिंदे यांनी अजित पवार यांच्या प्रमाणे सामंजस्याची भुमिका घ्यायला हवी होती, मात्र त्यांनी उगीचच ओढाताण करून घेतली.

खरे तर मुख्यमंत्री पदासाठी सर्वाधिक आसुसलेले नेते सध्या अजित पवारच आहेत परंतु राजकारणातील वास्तवाचे भान त्यांना आहे आणि म्हणूनच निवडणुकी आधी देखील त्यांनी मुख्यमंत्री पदासाठी संख्याबळ पाठीशी असावे लागते असे सांगत इतक्या कमी आमदारांच्या पाठिंब्यावर आपण मुख्यमंत्री पदाचे स्वप्न पाहू शकत नाही असे स्पष्ट केले होते. निवडणुकीनंतरही त्यांनी फारशी खळखळ न करता किंवा कुठलेही आढेवेढे न घेता मुख्यमंत्री पदासाठी फडणवीस यांना आपला पाठिंबा घोषित केला. परिस्थिती थोडी वेगळी असती आणि अजित पवारांच्या समर्थनाशिवाय सरकार स्थापन होणार नाही अशी काहीशी स्थिती असती तर मात्र अजित पवारांनी मुख्यमंत्री पदासाठी शक्य तितके ताणून धरले असते. परंतु आकड्यांचा खेळ हा पूर्णपणे भाजपच्या बाजूने आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी राजकीय समंजसपणा दाखवला. असा समंजसपणा एकनाथ शिंदेंनाही दाखविता आला असता. त्यामुळे सरकार स्थापनेला जो काही विलंब झाला तो टाळता आला असता, शिवाय शिवसेना आणि भाजप यांच्यातील नातेदेखील अधिक एकजीव आणि खेळीमेळीचे राहिले असते. आता ते तसे नाही असे म्हणता येणार नसले तरी एकनाथ शिंदे यांनी आधी मुख्यमंत्रिपदावरून आणि नंतर गृहमंत्री पदावरून ताणून धरण्याची जी काही भूमिका घेतली त्यामुळे भाजपचे शीर्षस्थ नेते मनातून नक्कीच नाराज असतील.

भाजपला विधानसभा निवडणुकीत १३२ इतक्या प्रचंड जागा मिळाल्यानंतर मुख्यमंत्री पदावर भाजपचा दावा असेल हे स्पष्ट होते तरीदेखील सुरुवातीचे काही दिवस मी जनतेच्या मनातला मुख्यमंत्री वगैरे भाषा शिंदे यांच्या तोंडी होती. मुख्यमंत्रिपद आपल्याकडेच राहावे यासाठी त्यांनी पडद्याआडून थोडेफार प्रयत्न नक्कीच केले, परंतु भाजप श्रेष्ठींनी खमकी भूमिका घेत शिंदेंना माघार घेण्यास भाग पाडले. मुख्यमंत्रिपद आपल्याला मिळणार नाही हे लक्षात आल्यानंतर किमान गृहमंत्रालय तरी आपल्याला मिळावे यासाठी शिंदे यांनी दबावाचे राजकारण सुरू केले. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत चर्चेचे गुऱ्हाळ सुरू होते. शेवटी नेमकी काय तडजोड झाली हे पुढील काही दिवसात स्पष्ट होणार असले तरी शपथविधी कार्यक्रम अगदी काही तासांवर येईपर्यंत एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार की नाही हे चित्र स्पष्ट झाले नव्हते. शिंदे यांची ही भूमिका थोडी अनाकलनीय म्हणावी लागेल. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ सरकार चालवण्यासाठी, पाच वर्ष टिकवून ठेवण्यासाठी पुरेसे आहे हे माहीत असूनही शिंदे यांनी इतकी ओढाताण का केली हे कळण्यास मार्ग नाही. शेवटी इतकी ओढाताण केल्यानंतरही त्यांच्या पदरी गृहमंत्रालय पडले नाही तर एकनाथ शिंदेंची प्रतिष्ठा बाधित होणार आहे. शिंदेंना मान्य असो अथवा नसो, त्यांना यापुढचे राजकारण भाजपचे बोट धरूनच करावे लागणार आहे आणि सद्यस्थितीत भाजपची ताकद राज्यात शिंदे यांच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. भाजपला सोडून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे, टिकवणे आणि वाढविणे एकनाथ शिंदेंसाठी खूप अवघड गोष्ट आहे. त्यामुळे भविष्यात उद्धव ठाकरे सारखे आपले हाल होऊ नयेत असे शिंदेंना वाटत असेल तर त्यांनी भाजपसोबत जुळवून घेण्यातच शहाणपणा आहे. अर्थात शिंदे यांनाही याची कल्पना नक्कीच असेल, परंतु त्यानंतरही त्यांनी भाजप नेत्यांना दुखाविण्याचे काम केले असेल तर प्रत्येक गोष्टीचा बारीक हिशोब ठेवणाऱ्या अमित शाहांनी याचीही दखल आपल्या डायरीत नक्कीच घेतली असावी. संजय राऊत यांच्या तर्काप्रमाणे शिंदे यांचे हे दबावाचे राजकारण भाजप श्रेष्ठींच्या इशाऱ्यानुसारच होत असेल तर हा सगळा भातुकलीचा खेळ ठरतो. परंतु तसे नसेल तर भविष्यात शिंदेंची चांगलीच कोंडी होऊ शकते.

## संतश्रेष्ठ जगनाडे महाराज तुकोबारायांचे खरे वैचारिक वारसदार डॉ.गणेश पांगारकर

**बीड । प्रतिनिधी**

**सतराव्या शतकात कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम संत करत असत, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेली होती.पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील सुदुंबरे या जगनाडे महाराजांच्या गावात तुकोबारायांचे किर्तन झाले.तुकोबारायांच्या विचारांचा पगडा जगनाडे महाराजांवर झाला.त्यांनी तुकोबारायांच्या गाथांचे लेखन करून तुकोबारायांच्या मानवतावादी लोककल्याणच्या विचारांचा वारसा जिवंत ठेवण्याचे कार्य संत श्रेष्ठ संताजी जगनाडे महाराजांनी करून तुकोबारायांचे खरे वैचारिक वारसदार असल्याचे सिद्ध केले.असे प्रतिपादन उपप्रचार्य तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर यांनी केले.आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात संत श्रेष्ठ संताजी जगनाडे महाराजांची जयंती महाविद्यालयाचे सल्लागार डॉ. अरुण भस्मे,प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. यावेळी**



**जगनाडे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमास एचएमएम विभागाचे प्रा. डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ.वैभव शहापुरे, डॉ.गणेश खेमाडे,धनंजय तागड आदि उपस्थित होते.**

पुढे बोलताना पांगारकर म्हणाले की, संतश्रेष्ठ संताजी जगनाडे महाराजांनी तुकोबारायांच्या गाथांच्या पुनर्लेखनाबरोबरच साहित्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले.त्यांनी तेलसिंधू, शंकरदीपिका,योगाची वाट,निर्गुण यासारखे महत्त्वपूर्ण व दर्जेदार ग्रंथ लिहून समाजप्रबोधनाचे कार्य केले. या कार्यक्रमास शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मानव विकास बसची चौकशी होणार !

**शिवाजी मस्के । जालना**

राज्यामध्ये शासनाने शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी मानव विकास बसची व्यवस्था केलेली आहे, परंतु सदरील बस चालक - वाहक यांना एसटी अधिकारी यांच्याकडून दबाव येत असल्याने सदरील बसचा वापर करता येत नाही. असे काही वाहक - चालक यांच्याकडून बोलल्या जात आहे. याप्रकरणी एसटी महामंडळाचे विभागीय नियंत्रक श्रीमती मनीषा सपकाळ यांनी चौकशी करावी,अशी मागणी शाळेतील मुलींच्या पालकांकडून करण्यात येत आहे.




याप्रकरणी काही प्रवासी मुलींना बसमध्ये प्रवेश करून दिल्या जात नाही. अशावेळी वाहक व चालक काही नियमाने बोलण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कारवाई केल्या जाते. यामुळे बस कर्मचारी यांना दबाव येत असल्यामुळे व त्यांचा नोकरीचा प्रश्न असल्यामुळे याप्रकरणी ते काही करू शकत नाही. याची जबाबदारी फक्त अधिकाऱ्यांची आहे. याप्रकरणी विभागीय नियंत्रक मनीषा सपकाळ यांनी लक्ष दिले तरच प्रश्न सुटू शकतो, असे बोलल्या जात आहे. सर्व चालक वाहक यांना सूचित करण्यात येते की दिनांक ९ /१२/ २०२४ व दिनांक १०/१२/ २०२४ रोजी शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद जालना यांच्याकडून मानव विकास बसचे व मानव विकास विद्यार्थ्यांचे निरीक्षण करणे बाबत मानव विकास बस मध्ये येणार आहेत तरी मानव विकास बसवर कार्यरत असणारे चालक/वाहक यांनी संबंधित अधिकाऱ्यासोबत सौजन्याने वागावे व मानव विकास फेरीवर फक्त मानव विकास विद्यार्थिनी प्रवास करतील व रा.प. प्रवासी यांना प्रवास करू देऊ नये संबंधित अधिकाऱ्याकडून कोणती तक्रार येणार नाही याची काळजी घ्यावी व आपली नोकरी धोक्यात न टाकता नियमाप्रमाणे काम करावे, असे काही कर्मचाऱ्याकडून बोलल्या जात आहे.

## धारूरला श्री.स्वामी समर्थ महाराजांचा पालखी सोहळा दिमाखात संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**धारूर शहरात श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या दुतीय वर्धापन दिनानिमित्त भव्य अशा पालखी सोहळा आयोजित करण्यात आला.**

प पू गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने श्री स्वामी समर्थ सेवा आणि आध्यात्मिक विकास केंद्र किल्ले धारूर येथे सुरू होऊन दोन वर्ष पुर्ण झाली. या दोन वर्षात रक्तदान शिबिर, आरोग्य शिबीर, प्रभू श्रीराम जन्मोत्सव, दत्ता जयंती, स्वामी महाराजांची जयंती,गुरुचरित्र पारायण,



संक्रांती निमित्त हळदी कुंकू असे अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच महाराजांची त्रिकाळ आरतीची सेवा, प्रहरे सेवा ,अब्ज चंडी अंतर्गत सर्व सेवा या सर्व सेवा मागील दोन वर्षात अखंडपणे सुरू आहेत. या सर्व सेवांमध्ये प्रामुख्याने महिला सेवेकरी सक्रिय असतात हे विशेष. द्वितीय वर्धापन दिन निमित्त दि ७डिसेंबर २४ शनिवारी रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिला व पुरुष सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला सेवेकर्याणी फुगडी खेळत तसेच सद्गुरू प्रदक्षिणा घालून आनंदोत्सव साजरा केला. सर्व सेवेकरी यांच्या नियोजनात हा सोहळा अतिशय शिस्तबध्द पध्दतीने पार पडला.

## आजपासून श्री स्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळा

**वडवणी प्रतिनिधी**

**'दरवर्षी अतिशय नियमबध्द रीतीने श्रीदत्त जयंती सप्ताह साजरा होतो. या सप्ताहातील गुरुचरित्र पारायण सकाळी ८.३० ते १० दरम्यान सामूहिक रीतीने करण्यात येते. तेव्हा इच्छुकांनी पारायण सुरु होण्याच्या १५ मिनिट आधी केंद्रात हजर असणे आवश्यक आहे. याशिवाय सप्ताहामध्ये दररोज २४ तास प्रहरे दिले जातात. सकाळी ८ ते रात्री ८ महिला सेवेकरी व रात्री ८ ते सकाळी ८ पर्यंत पुरुष सेवेकरी प्रहर सेवा रुजू करतील. अशी माहिती श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने देण्यात दिली.**



श्रीदत्त जयंतीनिमित्त शहरातील चिंचवण रोड स्थित दिंडोरी प्रणित श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात ९ डिसेंबर पासून अखंड नाम जप, यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून हा सप्ताह दिंडोरी प्रणित श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात वर्षभर होणाऱ्या उत्सवातील सर्वात महत्वाचा उत्सव मानला जातो. दिंडोरी प्रणित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्गाच्या चिंचवण रोड स्थित श्री स्वामी केंद्रात दरवर्षी सप्ताहात हजारो सेवेकरी उपस्थित रहातात. सप्ताहात सामूहिक गुरुचरित्र पारायण केले जाते, विशेष म्हणजे या पारायणासाठी शेकडो सेवेकरी आपला सहभाग नोंदवितात. ९ डिसेंबर ते १५ डिसेंबर पर्यंत म्हणजेच दत्त जयंती पर्यंत हा सप्ताह साजरा होणार आहे. यामध्ये दररोज सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८.१५ नित्य स्वाहाकार, ८.३० ते १० वाजता पर्यंत गुरुचरित्र वाचन, १०.३० ला नैवेद्य आरती, १०.४५ विषेश याग त्यानंतरदुपारच्या सत्रात दुपारी २ ते ५.३० वाजता दुर्गा सप्तशती व श्री स्वामी समर्थ पाठ वाचन, सायंकाळी ६ वाजता औदुंबर प्रदक्षिणा, ७ वाजता विविध विषयांवर मार्गदर्शन आणि ७.३० ला नित्यसेवा व नित्यध्यान केले जाते. या सप्ताहामध्ये दैनंदिन अध्यात्मिक कार्याशिवाय प्रत्येक दिवशी विशेष याग केले जातात. यामध्ये सप्ताहाच्या प्रथम दिवशी म्हणजेच ९ डिसेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता नित्य स्वाहाकार, मंडल स्थापना, अग्निस्थापना केल्या जाईल. १० डिसेंबर रोजी श्री गणेश याग, ११ डिसेंबर श्री गीताई याग, १२ डिसेंबर चंडी याग, १३ डिसेंबरश्री स्वामी याग, १४ डिसेंबर श्री रूद्र याग, श्री मल्हारी याग, १५ डिसेंबर रोजी बली पूर्णाहुती व दुपारी १२.३९ वाजता दत्त जन्मोत्सव साजरा केला जाईल. तर १६ डिसेंबर रोजी श्री सत्य दत्त पूजन, देवता विसर्जन, अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सांगता व सकाळी १०.३० वाजता महाआरती केली जाणार आहे. ९ डिसेंबर पासून १६ डिसेंबरपर्यंत होणारे सर्व याग सकाळी १०.३० वाजता सुरू होतील. तरी दिंडोरी प्रणित अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्गाच्या चिंचवण रोड स्थित श्री स्वामी केंद्रात साजऱ्या होणाऱ्या महाउत्सवात सर्व सेवेकरी परिवारानी तन मन धनाने सहकार्य करावे असे आवाहन श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

### स्वराज्य नगर,गणपत नगर,पंचशीलनगर मध्ये एक कोटीच्या विकास कामाचा शुभारंभ

# बीड शहरात दर्जेदार रस्ते निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील-सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील स्वराज्य नगर,गणपत नगर,पंचशीलनगर भागातील रस्त्यांचा प्रश्न अनेक दिवसांपासुन प्रलंबित होता. शिवसेनेचे मुख्य नेते तथा तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भागातील रस्त्यासाठी एक कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला होता. आता रस्त्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल. आता पुन्हा राज्यात महायुती सरकार स्थापन झाले असून शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील रस्त्यांसाठी भरीव निधी आणून दर्जेदार रस्ते निर्माण करण्यासाठी कायम प्रयत्नशिल असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.**

शहरातील स्वराज्य नगर,गणपत नगर,पंचशीलनगर भागातील रस्ते, नाली व विकास कामांचा शुभारंभ रविवारी (दि.८) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या प्रयत्नामुळे शहरातील स्वराज्य नगर, गणपत नगर भागातील अत्यंत महत्त्वाचा मुख्य रस्ता व नाली कामासाठी ६५ लक्ष रुपये व पंचशीलनगर भागातील विश्वरत्न कॉलनी येथे रस्ता व नाली साठी ३५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली. पुढे मुळूक म्हणाले की, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात राज्यात अनेक विकास कामे झाली. त्याचाच एक भाग म्हणून आज या भागातील रस्त्यासाठी निधी मिळाला असून आज प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली. राज्यात पुन्हा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार आले असुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील रस्ते व विकास कामांसाठी आणखी भरीव निधी आणून दर्जेदार रस्ते निर्मितीवर आमचा भर राहणार असल्याचे मुळूक म्हणाले. यावेळी स्वप्नील गलधर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास राष्ट्रवादी शिक्षक जिल्हाध्यक्ष प्रा. गोपाळ धांडे ,जिल्हा संघटक योगेश नवले ,भाजपाचे संदीप उबाळे, राहुल मस्के, वंजारे साहेब ,प्रमोद शिंदे, शिनगारे साहेब, हर्षद वडमारे ,हर्षद जोगदंड, रवी वाघमारे ,शिवसेना शहर प्रमुख नंदू पिंगळे , राजू हरकुडे, संजय नाईक , गणेश गळगटे सह स्वराज्य नगर ,गणपत नगर पंचशील नगर मधील नागरिक व महिला भगिनी तरुण मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.




## पान १ वरून...

### शेतकरी आंदोलकांवर फोडल्या

त्यांनी शेतकऱ्यांना परत फिरण्याच्या सूचना केल्या. दरम्यान, शेतकरी फेब्रुवारी २०२४ पासून दिल्ली हरीयाणामधील शंभू सीमेवर आंदोलनाला बसले आहेत. गेले ३०० दिवस हे आंदोलन सुरु आहे. शेतमालाला किमान आधारभूत किंमत मिळावी व कर्जमाफी या प्रमूख मागण्यासांठी शेतकऱ्यांचे हे आंदोलन सुरु आहे.

----------

### पंकजा मुंडेंनी घेतली मुख्यमंत्री

नेमका काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. पंकजा मुंडे यांचा मंत्रीमंडळात समावेश झाला तर त्यांना कोणत खाते मिळणार याची देखील चर्चा सुरु आहे.

--------------

### रडगाणं थांबवा अन् विकासाचं

दुसरे कोणी जिंकले की बॅलेट पेपरवर निवडणुका घ्यायची मागणी करायची. विरोधी पक्षाकडे आता मुद्दा राहिलेला नाही. विरोधी पक्षाला जनतेने चारीमुंड्या चीत केले आहे. जनतेने विरोधकांना त्यांची जागा दाखवली आहे. घरी बसणाऱ्यांना लोकं मतदान करत नाहीत, फिल्डवर काम करणाऱ्यांना मतदान करतात, असा टोला एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटासह महायुतीला लगावला.

-------------

### मारकडवाडी ग्रामस्थांचा शरद पवारांच्या

काही हरतात पण महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण झाली होती. प्रक्रिया आणि मतदारांना आत्मविश्वास वाटत नाही. ईव्हीएमच्या माध्यमातून मतदार मतदानासाठी जातो आणि आत्मविश्वासाने बाहेर पडतो पण काही निकालांमुळे लोकांमध्ये शंका निर्माण झाल्याचा उल्लेख देखील या कार्यक्रमात त्यांनी केला.

-----------

### जिंकलेल्यांना स्वतःच्या

त्यांच्याबद्दल काही बोलायचे नाही असे नाही असे सांगत आपल्या हक्काची मुंबई आपल्यापासून लचके तोडून नेली जात आहे. मात्र आपण षंढासारखे फक्त बघत राहतो अशी खोचक टीका मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे नाव न घेता केली. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, वास्तविक पाहता एखाद्याचा पराभव झाला तर त्याच्याकडे कोणी जात नाही. विजयी झाल्यानंतर तर सगळेच येतात. परंतु तुम्ही माझ्याकडे आलात. ज्यांना विधानसभा निवडणूकीत विजय मिळविला. त्यांनाही मिळालेल्या विजयावर विश्वास बसत नाही. त्यांच्या विजयाचा जल्लोष कुठेच नाही. या विजयात ईव्हीएमचा घोटाळा असेल आणि अन्य काही घोटाळे असतील मात्र त्या घोटाळ्यामुळेच त्यांचा विजय झाला आहे. त्यामुळेच त्यांच्या विजयाचा उत्सव किंवा विजय साजरा केला गेला नसल्याची टीका यावेळी भाजपाचे नाव न घेता केली. ते म्हणाले की, राज्यात चोर-दरोडेखोरांचं राज्य आले आहे. त्यामुळे तुमच्या लढ्यात खांद्याला खांदा लावून उभा असेन असेही यावेळी त्यांनी सांगितले. शेवटी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मी जेव्हा फिरत होतो सगळे म्हणत होते की, लोकांच्या मनातील मुख्यमंत्री तुम्हीच आहात. तुम्हीच येणार. मला गंमत वाटते की जे काही सर्व्हे चालले होते, त्यांच्या मनातील मुख्यमंत्री काली असा सवाल उपस्थित करत हे सगळं राज्य चोर आणि दरोडेखोरांचं राज्य आहे. हे राज्य आता उलथवून आपल्याला टाकावं लागेल असे सांगत एक ठिणगी तर आता पडली आहे. मागच्या रविवारी मी बाबा आढाव यांना भेटून आलो. आता तुम्हाला झोपून चालणार नाही. मुंबईच्या मराठी माणसाचा, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा अस्तित्वाचा प्रश्न आहे. योग्य वेळी मशाल हाती घेतल्याचे सांगत शिवसेनेचा भगवा हाती घेतला असल्याचेही यावेळी त्यांनी म्हटले.

----------

### राज्यघटनेची पुस्तिका हाती घेत

राहिलेल्या आठ आमदारांचा शपथविधी सोमवारी अध्यक्षांच्या दालनात होणार आहे. तसेच विधानसभा अध्यक्षाची निवडही सोमवारीच करण्यात येणार आहे.

---------

### समझोता करण्यासाठी गेलेल्या

मिटविण्यासाठी विनोद, विलास कुराडे, विनोद बलवंत आणि भाऊ आकाश हे सुरज वाघमारे याच्या घराकडे गेले. त्या ठिकाणी वाद मिटविण्याबाबत चर्चा सुरु असताना सुरज घरात गेला आणि लोखंडी तलवार आणून त्याने विनोदवर वार केला. तर त्याचे भाऊ संतोष आणि शिवम यांनी विनोदला लाकडी दांड्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी विनोद सोबत आलेल्या ग्रामस्थांनी त्याला हल्लेखोरांच्या तावडीतून वाचविले आणि उपचारासाठी स्वाराती रुग्णालयात दाखल केले. सदर फिर्यादीवरून सुरज संतोष वाघमारे, मनोज संतोष वाघमारे आणि शिवम संतोष वाघमारे या तिघांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास एपीआय रंगनाथ जगताप करत आहेत.

---------

मारकडवाडीप्रमाणे राज्यातील अनेक गावामध्ये

त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. ७६ लाख मते कशी वाढली, याचे उत्तर निवडणूक आयोगाला द्यावे लागेल पण ते समाधानकारक उत्तर देत नाहीत. मतांची चोरी करणे हा लोकशाहीचा दिवसाढवळ्या केलेला खून आहे. लोकशाहीमध्ये अशा प्रकारे असंतोष निर्माण झाला असेल तर त्याची दखल घ्यावीच लागले. विरोधी पक्ष या नात्याने आम्ही सभागृहात व रस्त्यावर जनतेच्या या मागणीसाठी लढू, असा इशाराही यावेळी दिला.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....



## देवगाव येथे लंपी लसीकरण व पशु जनगणना शिबिर संपन्न



देवगाव येथील लंपी लसीकरण व पशुजनगणना शिबिराचे आयोजन श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सा) संचलीत पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका विद्यालय, देवगाव ता.केज जि बीड व पशुवैद्?यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाणाने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्?यापीठ नागपूर २५ व्या स्थापना दिनानिमित्त डॉ. पंडित नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०६/१२/२०२४ रोजी मौजे देवगाव ता. केज जि. बीड येथे लंपी लसीकरण व पशुजनगनणा डॉ.दिक्षांत जोगदंड व डॉ.वाकळे मंडाम व पशुधनपरवेक्षक शेलार एस.बी. यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मान्यवरांकडून लंपी लसीकरणा विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच पशुजनगनने विषयी माहिती देण्यात आली यावेळी विद्यालयाचे प्राचार्य बागलाने सर. कृषी विद्यालयाचे शेख सर ठोबरे व्हिवाय सर,कानडे सर.भोजने सर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्?यार्थी हजर होते.

# केज रोटरीचा अनोखा उपक्रम : वाहनांना रिफ्लेक्टर लावून केली जनजागृती

सारणी । दिनकर जाधव

केज शहरात व परिसरात रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा उपक्रम रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने राबवण्यात आला. यावेळी शंभरहून अधिक वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले.

केज तालुका व परिसरातील असंख्य वाहनांच्या पाठीमागील बाजूस रिफ्लेक्टर नसल्याने अशा वाहनांची स्थिती किंवा गती लक्षात न आल्याने या वाहनाला पाठिमागील बाजूस धडक दिल्याने अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनल्याने याबाबत वाहनधारक, वाहनचालक व नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने दरवर्षी मुख्य महामार्गावर जनजागृती करून 'रिफ्लेक्टर जागृती अभियान राबवले जाते.

याही वर्षी केज रोटरीच्या वतीने श्री



### नागरिक सरसावले पण प्रशासन मात्र सुस्तावलेच

छत्रपती शिवाजी महाराज चौक व भवानी चौक (धारूर चौक) येथे दि.०६ डिसेंबर रोजी सकाळी रिफ्लेक्टर अभियान राबविण्यात आले. याशिवाय केज विकास संघर्ष समितीच्या वतीने केज तालुका तहसीलदार व पोलीस स्टेशन यांना निवेदन देऊन रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनावर कठोर कार्यवाही करावी. केज तालुका व परिसरातील साखर कारखाना प्रशासनाला विशेष पत्र लिहून त्यांच्या कक्षेत ऊसवाहतुकीचे काम करणाऱ्या सर्व बैलगाड्या आणि वाहनांना पाठीमागून रिफ्लेक्टर फलक किंवा रिफ्लेक्टर पेपर्स स्टिकर्स सक्तीचे करावेत अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने कार्यवाही न केल्यास जनतेच्या सहभागाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा केज विकास संघर्ष समितीने दिला आहे. या उपक्रमात केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन असरार कुरेशी, को-चेअरमन बापुराव सिंगण, हनुमंत भोसले, सूर्यकांत चवरे, दादा जमाले पाटील, अरुण अंजाण, विजय जॅकेटिया इत्यादी रोटरी सदस्य व नागरिक सहभागी होते.

**यासंदर्भात पुरोगामी पत्रकार संघ केज शाखेच्या वतीने तहसिलदार यांना दिले होते निवेदन**

केज तालुक्यातील साखर कारखाना संचालक यांनी ऊस वाहतूक वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्यासाठी सक्ती करावी या मागणीचे निवेदन पुरोगामी पत्रकार संघ केज शाखेच्या वतीने दि. २५ नोव्हे. रोजी तहसिलदार व पोलिस स्टेशन यांना दिले होते. पण अद्याप पर्यंत प्रशासन आणि पोलिस यांच्या वतीने कुठलीच कार्यवाही आणि जनजागृती झाली नाही.

## मोगर्लिंग खंडोबा यात्रा महोत्सवाचा जंगी कुस्त्याने समारोप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा येथील जागृत देवस्थान असलेल्या श्रीखंडोबा मोगर्लिंग येथे दोन दिवशीय यात्रा महोत्सवाचे आयोजन ०७ व ०८ डिसेंबर रोजी करण्यात आले होते.या यात्रा महोत्सवाची सांगता जंगी कुस्त्याने करण्यात आली,

माजलगाव तालुक्यातील मोगरा व पंचक्रोशीतील जागृत देवस्थान असलेल्या श्रीखंडोबा मोगर्लिंग येथे दोन दिवशीय यात्रा महोत्सवाचे आयोजन ०७ व ०८ डिसेंबर रोजी करण्यात आले होते.यामध्ये दि ०७ डिसेंबर शनिवार रोजी १२ गाड्या ओढणे,छबिना, व डोहातील झारी काढण्याचे कार्यक्रम झाला तर दुसऱ्या दिवशी दि ०८ डिसेंबर रोजी नांगर तोडणे हा कार्यक्रम होऊन या दोन दिवशीय यात्रोचा समारोप जंगी कुस्त्याने करण्यात आला. रविवारी दुपारी १:००



**दोन दिवसीया यात्रा महोत्सवात गाड्या ओढणे,छबीना,डोहातील झारी काढण्यासह नांगर तोडण्याचा कार्यक्रम संपन्न**

वाजेच्या सुमारास जंगी कुस्त्यांचे उद्घाटन मोंगरलींग खंडोबा देवस्थानचे पुजारी शिवाचार्य

शिवाजी महाराज भरडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी सरपंच गिन्यानदेव राठोड,उपसरपंच संदिप सावंत, पत्रकार ज्योतिराम पाढरपोटे,माजी सरपंच बबन पवार, उध्दवराव धुमाळ, मोकिंदा चव्हाण,रामभाऊ मेढे,भगवान पौळ यांची प्रमुख उपस्थिती होती.या जंगी कुस्त्यामध्ये १० रुपयांपासून ५००१ हजार रुपयांच्या कुस्त्या झाल्या.हा दोन दिवशीय यात्रा महोत्सव शांततेत पार पाडुन यशस्वी करण्यासाठी मोगरा ग्रामपंचायतीचे सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,तसेच शु.ति. लिमगाव, नि.टाकळी, आनंदगाव, डाकेपिंप्री,खरात आडगाव व मोगरा ग्रामस्थ व यात्रा महोत्सव समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



कार्यालय नगर परिषद अंबड येथे ८ डिसेंबर रविवार रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी जितेंद्र देशमुख, ज्ञानेश्वर शेळके, रामदास मांडवे, विनोद मगर, हे कर्मचारी उपस्थित होते.

## जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड । प्रतिनिधी

लोकनेते मा.मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड व डॉ.प्रफुल्ल विजयकर यांचे प्रेडिक्टिव्ह होमिओपॅथी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने ''निराशे कडून आशेकडे''( ) दिव्यांग रुग्णांसाठी तपासणी व होमिओपॅथिक उपचार शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे,प्राचार्य महेंद्र गौशाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.होमिओपॅथिक मटेरिया मेडीका विभागाच्या वतीने दिनांक ८ डिसेंबर रविवार रोजी सकाळी नऊ वाजता होमिओपॅथीचे सुप्रसिद्ध तज्ञ डॉ.प्रफुल्ल विजयकर यांच्या संकल्पनेतील शिबिराचे उद्घाटन डॉ.अनिकेत शितोडे,डॉ.रजत मालोकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचे उपप्रचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर,एच एमएम विभागाचे प्रोफेसर डॉ शेख नासेर,डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ. गिरीश धडफले,डॉ.उषा मस्तुद,डॉ.ऋचा डाके यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिरात मतिमंद,गतिमंद,सेरेब्रल पल्सी ( ), कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार, , झटके येणे () अशा विविध प्रकारच्या आजारांवरील रुग्णांवर होमिओपॅथिक चिकित्सा पद्धतीच्या सिद्धांतानुसार रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध उपचार केले जातात.अशा शिबिरांच्या माध्यमातून डॉ.प्रफुल्ल विजयकर यांनी जवळपास पाच हजार रुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत.या शिबिरास डॉ.सात्विक नारायणा,डॉ.शिवप्रताप सिंग,डॉ. तेजवीर कौर, डॉ.शिवानी पाल यांनी दिव्यांग रुग्णांची तपासणी करून औषधोपचार केला.या शिबिराचा विभागातील जवळपास ३८० दिव्यांग रुग्णांनी लाभ घेतला.शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ.शिवानी घुमरे डॉ.दीक्षा इकतपुरे डॉ. दिकेश ठीकरे यांनी परिश्रम घेतले.

## श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित बी फार्मसी महाविद्यालयास नॅक समितीकडून 'बी प्लस' मानांकन प्राप्त

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या बी फार्मसी महाविद्यालयास नुकतीच नॅक समितीने भेट देऊन महाविद्यालयातील संपूर्ण अभ्यासक्रम व तेथील सुविधांची तपासणी केली होती . या संपूर्ण तपासणी अंती या समितीने बी फार्मसी महाविद्यालयास समितीचा + हा दर्जा प्रदान केल्याचे पत्र दिले आहे. अंबाजोगाई शहरातील हे महाविद्यालय फार्मसी क्षेत्रातील बीड जिल्ह्यामधिल पहिले नॅक मूल्यांकन प्राप्त महाविद्यालय ठरले आहे.



दि २५ व २६ नोव्हेंबर रोजी बंगळूर येथील राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (नॅक) समितीकडून या महाविद्यालयास भेट देऊन पाहणी करण्यात आली होती. दोन दिवस चाललेल्या या भेटीदरम्यान समितीने महाविद्यालयातील सर्व विभागांचे ज्यामध्ये शैक्षणिक उपक्रम, भौतिक सोयी-सुविधा, नवीन उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती, प्रशासकीय बाबी, विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद अशा अनेक गोष्टींची पाहणी व पडताळणी केली होती. बी फार्मसी महाविद्यालयास पहिल्यांदाच नॅक समितीचे मानांकन मिळाल्यामुळे संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून २०१० साली बी फार्मसी महाविद्यालय सुरू केले आहे. तेव्हापासून या महाविद्यालयात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षण असण्यासोबतच ते शिक्षण सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असावे असे संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर कांताप्रसाद मोदी यांचे ध्येय आहे. आजपर्यंत या महाविद्यालयातुन अनेक विद्यार्थ्यांनी आपले येथील शिक्षण पूर्ण करून त्यापुढील उच्च शिक्षण विविध प्रदेशात घेत आहेत. त्यामधील अनेक विद्यार्थी हे यशस्वी उद्योजक झाले असून अनेक विद्यार्थी विविध ठिकाणच्या प्रशासकीय सेवेत त्याचबरोबर बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत.

स्थापनेपासूनच या संस्थेने आपल्या अनुभवी व तज्ञ शिक्षक तथा प्राध्यापक यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात हातभार लावला आहे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.पडताळणीसाठी आलेल्या नॅक समितीने महाविद्यालयाच्या संपूर्ण कामकाजाची पाहणी केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी यावेळी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची सखोल अशी माहिती समितीस देतांना महाविद्यालयाचा नयनरम्य नैसर्गिक परिसराबाबत देखील अवगत केले.महाविद्यालयातील या सर्व बाबी व निकष यावरून या महाविद्यालयास + हा दर्जा बहाल केला आहे. महाविद्यालयाने संपादित केलेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, व्यवस्थापकीय संचालक संकेत राजकिशोर मोदी तसेच संस्थेचे मार्गदर्शक असलेले प्राचार्य डॉ बी. वाय. खडकभवी, प्रा. व्ही. बी. चव्हाण व प्रा.डी. एच. थोरात यांनी प्राचार्य डॉ. संतोष तरके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व त्यांच्याबरोबरच विद्यार्थी पालक तथा माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**मुंबई : महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री मा. ना. अजित दादा पवार यांची जालन्याचे आ. अर्जुनराव खोतकर ,घनसावंगीचे आ. हिकमत दादा उढाण यांनी भेट घेऊन उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.**

पान ६ वरून...

### माजी मंत्री जयदत्त आण्णांच्या

बहीर, शिवाजी गवळी, नवनाथ बहीर यांच्यासह विद्यार्थी-पालकांची उपस्थिती होती. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रा.केशव भांगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक विजयकुमार दगडे, शेख एस.वाय., सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

### सर्वसमावेशक नेतृत्व असलेले

यांनी ७८ हजाराच्या फरकाने दणदणीत विजय संपादन केला आहे.

यापूर्वी तीन वेळा विधानसभेचे नेतृत्व केलेले आहे.एक वेळा बीड- लातुर-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेचे आमदार म्हणुन काम केलेले आहे.त्यांच्या जवळ आमदारकीच्या चार टर्मचा दांडगा अनुभव आहे.त्यांचा जनसंपर्कसुद्धा खूप मोठा असल्याने माजी मंत्री सुरेश धस यांना कॅबीनेट मंत्री करावे अशी मागणी कडा येथील ग्रामपंचायत सदस्य आरिफ शेख यांनी केली आहे.

### वर्णी महापूजेने श्री योगेश्वरी देवीच्या

तसेच आराध बसलेल्या सर्व महिलांच्या निवासाची, पाण्याची व त्यांना मूलभूत गरजा पुरवण्यासाठी देवल कमिटीच्या वतीने उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. मंदिरात बसणाऱ्या सर्व आराध मंडळाच्या सकाळच्या नाश्ता ( फराळ), दुपारचे जेवण त्याचबरोबर संध्याकाळी फराळ अशी भोजनाची व्यवस्था देखील मंदिर प्रशासनाकडून केली गेली असल्याची माहिती योगेश्वरी देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे,सचिव प्रा. अशोक लोमटे यांनी दिली. या वर्षी मंदिरात बसणाऱ्या प्रत्येकाची नावनोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यात येणार आहे जेणेकरून मंदिर परिसरात किती आराध बसले आहेत याची माहिती मंदिर प्रशासनाकडे राहून त्यांची संपूर्ण व्यवस्था मंदिर प्रशासनाकडून केली जाईल असेही अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे तथा सचिव प्रा अशोक लोमटे यांनी याप्रसंगी सांगितले आहे.

# बाबासाहेब हे एक उर्जास्त्रोत - अॅड.अजय बुरांडे

## आधार मल्टीस्टेट येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणनिमित्त अभिवादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील आधार मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लिमिटेड शाखा अंबाजोगाई येथे महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन पार पडला.

यावेळी प्रसिद्धी विधिज्ञ अॅड.अजय बुरांडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या एकूण आयुष्याची जडण-घडण व सारीपाट विषद केला. यावेळी बोलताना अॅड.बुरांडे म्हणाले की, बाबासाहेब म्हणजे भारत देशाचे एक उर्जास्त्रोत होते. त्यांचा सर्व विषयांचा अभ्यास हा दांडगा होता. त्यांना एकूण नऊ भाषा अवगत होत्या

अंबाजोगाई शहरातील आधार कॉ.ऑप.मल्टीस्टेट ही सहकार व आर्थिक चळवळीतील व्यक्तींचे आधारस्तंभ म्हणून काम करत आहे. ज्या-ज्या चळवळी उदयास येतात. त्या चळवळींना बळकटी देण्याचे काम आधार मल्टीस्टेट करत असते. त्या सोबतच समाजाचा आर्थिक स्तर उंचावला जावा यासाठी जे वेगवेगळे घटक आहेत. त्या घटकांना आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम करण्याचा आधार मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी चा प्रयत्न राहिलेला आहे. सामाजिक चळवळ गतीमान करण्यासाठी ही मल्टीस्टेट काम करत आहे. त्याअनुषंगाने सामाजिक स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचा एक भाग म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने व्याख्यान व चित्रफित दर्शन कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माकपाचे बीड जिल्हा सचिव अॅड.अजय बुरांडे हे होते. तर या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मल्टीस्टेटचे चेअरमन अॅड.सुनिल सौंदरमल, ज्येष्ठ संचालक प्रा.डी.जी.धाकडे, ज्येष्ठ संचालक सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे व सूर्यवंशी पाटील स्टेनो माजलगाव आदी



मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनपटावरील माहिती पट दाखविण्यात आला. त्यानंतर अॅड.अजय बुरांडे यांनी सविस्तर मार्गदर्शन करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र उलगडले. याप्रसंगी बोलताना अॅड.बुरांडे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे व्यक्तीमत्व जगाच्या पाठीवर लाभलेले एक मोठे वरदान आहे. आजच्या काही सामाजिक चळवळी अस्तित्वात आहेत. किंवा जो काही सामान्य माणसाला जगण्याचा अधिकार मिळाला आहे. ती बाबासाहेबांची देण आहे. बाबासाहेब हे नाव अवघ्या जगभर व्यापलेले आहे. त्यांच्या कामाचा आवाका हा संपूर्ण जगात राहिलेला आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणात अभ्यास करून सर्व घटकांना कायद्याच्या आणि विशेषतः संविधानाच्या कक्षेत घेवून त्यांना न्यायदानाची प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी प्रयत्न केले. बाबासाहेबांनी जो मार्ग दाखविला. त्या मार्गावर जो चालेल त्याच्या आयुष्याला कलाटणी मिळालेली आहे. चळवळीचे अंग असलेले बाबासाहेब हे नक्कीच इतर महापुरूषांपेक्षा वेगळे आहेत. त्यांचा त्याग आणि समर्पन हे कोणीही विसरू शकत नाही. बाबासाहेबांनी वंचित, शोषित,पिडीत, दुर्लक्षित घटकांना पटलावर आणून त्यांचे जीवन व जगणे सुसय्य करण्याचे काम केले आहे. बाबासाहेब आंबेडकर हे नाव जगाच्या पाठीवर कोरलेले आहे. आणि ते नाव जोपर्यंत मानवजात भुतलावर आहे. तोपर्यंत कोणीही मिटवू शकणार नाही एवढ्या दिव्य दृष्टीचे ते महामानव होते. या प्रसंगी चेअरमन अॅड.सुनिल सौंदरमल यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जर आणखी दहा वर्ष राहिले असते. तर वेगळा भारत आणि वेगळी परिस्थिती राहिली असती. परंतु त्यांना तेवढे आयुर्मान लाभले नाही. तरी देखील त्यांनी जगाला हेवा वाटावा असे काम केले. बाबासाहेब हे भारतीय न्याय शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते. दलित बौद्ध चळवळीला त्यांनी प्रेरणा दिली. आणि सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांचे मोठे योगदान राहिले. भारताचे पहिले कायदेमंत्री आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार व भारतीय बौद्ध धर्माचे पुनरूज्जीवक म्हणून त्यांनी काम पाहिले. असे हे आभाळाएवढे व्यक्तीमत्व आज जरी नसले तरी त्यांचे दिव्य कार्य हे येणारे हजारो लाखो वर्षे अबाधित राहणार आहे. यात कसलीही शंका नसल्याचे अॅड.सौंदरमल म्हणाले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते आधार मल्टीस्टेच्या दिनदर्शिका-२०२५ चे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आधार मल्टीस्टेटचे सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक, सहकारी,स्नेहीजन मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पतसंस्थेचे सर्व कर्मचारी, अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

cmyk

# निवडणुकीच्या काळात विदर्भातील १६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## कर्जमाफी करुन राज्याला विशेष पॅकेज द्या, किसान सभेची सरकारकडे मागणी

राज्यात सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होताना दिसत आहे, नापिकी, कर्जबाजारीपणा, दुष्काळ अशा विविध कारणांनी शेतकरी आपलं आयुष्य संपवत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या ६० दिवसाच्या काळात विदर्भातील तब्बल १६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या करत आपलं जीवन संपवलं आहे. महाराष्ट्रात उर्वरित ठिकाणी सुद्धा अशाच प्रकारे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे वक्तव्य किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केले आहे. त्यामुळं केंद्र सरकारनं ही बाब लक्षात घेत महाराष्ट्रासाठी विशेष पॅकेज देत शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी पावलं टाकावीत अशी मागणी किसान सभेने केली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या ६० दिवसाच्या काळात विदर्भातील तब्बल १६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. उर्वरीत राज्यात देखील अशा आत्महत्या वाढत आहेत असे डॉ. अजित नवले म्हणाले. शेतीमालाचे भाव सातत्याने पाडण्याचे धोरण, वाढता उत्पादन खर्च व नैसर्गिक आपत्तीत होणारे शेतकऱ्यांचे नुकसान या प्रमुख कारणांमुळे शेतकऱ्यांच्या या आत्महत्या वाढत असल्याचे अजित नवले म्हणाले.

दरम्यान, केंद्र सरकारने शेतकरी आत्महत्येची बाब लक्षात घेत महाराष्ट्रासाठी विशेष पॅकेज जाहीर करावे अशी मागणी अजित नवले यांनी केली आहे. तसेच सरकारनं शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी पावलं टाकावीत.



### शेतकरी आत्महत्याग्रस्त भागाकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज

राज्यात विविध कारणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. सततची नापिकी, कर्जबाजारीपणा, हवामानातील बदल, शेत मालाला भाव नसणे इत्यादी अनेक कारणास्तव मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त भागाकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. तसेच आत्महत्यांसाठी कारणीभूत ठरणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी देखील प्रयत्न करणं गरजेचं आहे. या आत्महत्या रोखण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे? असा सवालही करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांचं संपूर्ण कर्ज माफ करुन शेतीमालाला रास्त दर देत, नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यांना दिलासा देणारी धोरण घ्यावीत. महाराष्ट्रात वाढत असलेल्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर वरील प्रमुख बाबींचा समावेश असणारे दिलासा पॅकेज शेतकऱ्यांना द्यावे, अशी मागणी किसान सभेच्या वतीने आम्ही करत असल्याचे अजित नवले म्हणाले.

# लाल भेंडीची अशा पद्धतीने करा लागवड

शेतकरी भाजीपाला लागवड करून जेवढे उत्पन्न पारंपारिक शेती करून घेतात तेवढे मिळत नाही. विशेषत: खास भाजीपाल्याची लागवड केल्यास अधिक उत्पन्न मिळते. आपण ज्याच्याबद्दल बोलत आहोत ते म्हणजे लाल भिंडी म्हणजेच लाल भेंडी. लाल भेंडीचे वैशिष्ट्य म्हणजे ती हिरव्या भेंडीपेक्षा जास्त फायदेशीर असते.

यासोबतच त्याचे पीकही सामान्य भेंडीच्या तुलनेत लवकर पिकते. लाल भिंडी म्हणजेच लाल भेंडीमध्ये विशेष औषधी गुणधर्म आहेत, त्यामुळे मोठ्या शहरांमध्ये त्याची मागणी कायम आहे. लाल भेंडीच्या लागवडीसाठी १ किलो बियाणे २४०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे, जे अर्धा एकर जमिनीत लागवड करता येते. जर आपण लाल भेंडी म्हणजेच लाल भेंडीपासून कमाईबद्दल बोललो तर लाल भेंडीची किंमत हिरव्या भेंडीपेक्षा ५-७ पट जास्त आहे. हिरवी भेंडी ४० ते ६० रुपये किलो दराने बाजारात उपलब्ध असताना २५० ते ३०० ग्रॅम लाल भेंडी ३०० ते ४०० रुपये किलो दराने विकली जाते. लाल भेंडीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे लाल भेंडीची मागणी देशापेक्षा परदेशात जास्त आहे. परदेशातही त्याची भरपूर लागवड होते. लाल भेंडीमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात, ज्याला लाल भेंडी असेही म्हणतात. यामध्ये



अँटीऑक्सिडंट्स आणि आयर्न मुबलक प्रमाणात आढळतात. ही लाल बोट साखरेच्या रुग्णांसाठी रामबाण उपाय असल्याचे सांगितले जाते. फक्त लागवड करताना त्यात सिंचनाची कमतरता भासणार नाही याची विशेष काळजी घ्यावी लागते. लागवडीनंतर हे पीक अवघ्या ४० ते ५० दिवसांत काढणीसाठी तयार होते. लाल भेंडी ही अशी भाजी आहे जिची उन्हाळ्यात मागणी जास्त असते. यामुळेच भारतीय शेतकरी आजकाल रेड लेडीफिंगरपासून भरपूर नफा कमावत आहेत.

# प्लास्टिक आच्छादनामुळे वाढतेय मातीचे प्रदूषण

कॅलिफोर्निया येथील स्ट्रॉबेरी लागवडीत प्लॅस्टिक आच्छादनाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. त्यामुळे मातीमध्ये प्लॅस्टिकच्या सूक्ष्म कणांचे प्रदूषण वाढत असल्याचे वॉशिंग्टन येथील संशोधनातून समोर आले आहे. या प्लॅस्टिक कणांचा जमिनीच्या आरोग्यावर दीर्घकालीन विपरित परिणाम होतो. याविषयी कॅलिफोर्निया पॉलिटेक्निक राज्य विद्यापीठातील पोस्ट डॉक्टरल संशोधक डॉ. एकता तिवारी यांनी ल्योन येथे आयोजित गोल्डश्मिट भू-रसायनशास्त्राच्या परिषदेत त्यांचे संशोधन सादर केले.

आपल्या संशोधनाबाबत माहिती देताना डॉ.तिवारी म्हणाल्या, की या अभ्यासासाठी आम्ही स्ट्रॉबेरी शेताचे सर्वेक्षण करून त्यातून जमिनीच्या वरील पृष्ठभागावरील मातीचे नमुने घेतले. या मातीच्या नमुन्यामध्ये प्रति हेक्टर सुमारे २ लाख १३ हजार ५०० प्लॅस्टिक कण आढळून आले आहेत. या विश्लेषणासाठी इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कोपीचा वापर करण्यात आला. थोड्या अधिक खोलीवरील नमुने घेतले असता त्याही पेक्षा अधिक प्लॅस्टिक कण आढळण्याची शक्यता आहे. कारण दरवर्षी स्ट्रॉबेरी उत्पादनामध्ये आच्छादन म्हणून वापरलेल्या प्लॅस्टिकचे ५ मि.मी.




आणि त्या पेक्षा मोठे कण मोठ्या प्रमाणात मातीमध्ये मिसळतात. या कणांचे विघटन होत नसल्यामुळे दशकापेक्षा अधिक काळ तसेच जमिनीत राहतात.प्लॅस्टिकऐवजी सेंद्रिय आच्छादनाला प्राधान्य हवे : प्लॅस्टिक आच्छादनाचे पिकाच्या वाढीवर काही चांगले परिणाम होत असले, तरी त्यापासून होणाऱ्या दीर्घकालीन प्रदूषणामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. मातीच्या कणांमध्ये प्लॅस्टिक कणांचे प्रमाण वाढत गेल्यास त्याचा मातीतील ओलावा, सूक्ष्म जिवांच्या श्वसन प्रक्रियेवर विपरित परिणाम होतो. पिकांना उपलब्ध होणाऱ्या नत्राचे प्रमाण कमी होते. मातीमधून प्लॅस्टिकचे छोटे छोटो कण काढण्याचे काम अत्यंत कठीण आणि खर्चिक आहे. एकदा प्लॅस्टिक आच्छादन वापरल्यानंतर अनिश्‍चित काळासाठी हे कण जमिनीमध्ये पडून राहतात. त्यामुळे भविष्यात आच्छादनासाठी सेंद्रिय घटकांच्या वापरावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. सेंद्रिय आच्छादन काही काळानंतर कुजून त्यातून सेंद्रिय कर्बासह अनेक पोषक घटकांची पिकाला उपलब्धता होते. जमिनीचे तापमान नियंत्रित राखले जाते आणि जमिनीतील ओलावा टिकून राहतो. परिणामी पाण्याची बचत होते. वनस्पतीभोवती उपयुक्त सूक्ष्म जिवांची वाढ होऊन सूक्ष्म वातावरण निर्मिती होते. त्यामुळे प्रकाश संश्लेषणाचे क्रिया वेगाने आणि सुरळीत पार पडते. जमिनीची होणारी धूप थांबते, तणांची वाढ होत नाही. पिकाची उत्पादकता, फळांचे उत्पादन आणि दर्जा सुधारण्यास मदत होते.

# उसावरील तपकिरी ठिपके आणि तांबेरा रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन!

ऊस पिकात प्रामुख्याने तांबेरा आणि पानावरील तपकिरी ठिपके या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. या पानावर आढळणाऱ्या बुरशीजन्य रोगांमुळे पिकाचे अंदाजे ५-४० टक्केपर्यंत नुकसान होण्याची शक्यता असते. या रोगांची लागण झाल्यामुळे पानाच्या पेशी, त्यामधील हरीतद्रव्य यांचा नाश झाल्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा निर्माण होऊन अन्न तयार करण्याची प्रक्रिया मंदावते त्यामुळे उसाचे उत्पादन आणि साखर उतारा सुध्दा घटतो. उसाचा नवीन पोंगा व कोवळी पाने रोगाने प्रादुर्भावग्रस्त झालेली आढळून येतात आणि ऊस उत्पादन व उत्पादकतेवर परिणाम दिसून येतो. जाणून घेऊ या रोगांची लक्षणे आणि नियंत्रण उपाय

तपकिरी ठिपके : जास्त पावसाचे प्रमाण असलेल्या भागामध्ये सॅरकोस्पोरा लॉन्जिपस नावाच्या बुरशीमुळे हा बुरशीजन्य रोग होतो. सुरूवातीला उसाच्या जुन्या पानांच्या दोन्ही बाजुवर अंडाकृती आकाराचे लालसर ते तपकिरी रंगाचे ठिपके आढळून येतात. या ठिपक्या भोवती पिवळ्या रंगाचे वलय दिसते ठिपक्याचा मध्यभाग वाळून, करड्या रंगाचा ठिपका, सभोवती लालकडा त्याला लागूनच पिवळे वलय असे एकमेकांत मिसळलेले असंख्य ठिपके निदर्शनास येतात. पानांवरील ठिपक्यांची संख्या वाढून शेजारील ठिपके एकमेकात मिसळून मोठे ठिपके तयार होतात अशा ठिपकयांमधील पेशी मरतात आणि प्रकाश संश्लेषण होत नाही. त्यामुळे ऊस उत्पादनावर आणि साखर उतार्यावर अनिष्ट परिणाम होतो. रोगाची लागण मोठ्या प्रमाणावर झाल्यास उसाच्या कांड्याची लांबी व जाडी कमी होतो.

तांबेरा : उसाच्या पानावरच दिसून येणारा हा बुरशीजन्य रोग आहे. सुरूवातीला बुरशीची लागण पानाच्या दोन्ही बाजूस होऊन पानावर लहान, लांबट



आकाराचे पिवळे ठिपके दिसतात. कालांतराने ठिपक्याची लांबी वाढून त्यांचा रंग लालसर तपकिरी होतो. ठिपक्याच्या भोवती फिक्कट पिवळसर हिरवी कडा तयार होऊन, पानाच्या खालच्या बाजूस ठिपक्याच्या जाग्यावर उंचवटे तयार होतात. असे ठिपके फुटुन नारंगी किंवा तांबूस तपकिरी रंगाचे बिजाणू बाहेर पडतात. तांबेराग्रस्त पाने हातावर चोळल्यास बिजाणूची पावडर पडते. हवेव्दारे या बिजाणूंचा प्रसार होऊन रोगाचा मोठ्या प्रमाणात दुय्यम प्रसार होतो. पानांवरील ठिपक्यांची संख्या वाढून शेजारील ठिपके एकमेकात मिसळून मोठे ठिपके तयार होतात. या रोगग्रस्त ठिपक्यातील पेशी मरुन जाऊन पाने करपलेली दिसून येतात. प्रकाश संश्लेषण क्रियेत व्यत्यय आल्याने उसाचे उत्पादन घटते.

रोगाचा प्रसार : उसाच्या पानावर पावसाच्या अथवा दवाच्या स्वरुपातील असलेले पाणी प्रामुख्याने रोग वाढीसाठी महत्वाचे व अनुकुल घटक आहे. पानावर ओलसरपणा असताना बीजाणू रुजून बुरशी तयार होते. ही बुरशी पानांच्या आंतरभागात प्रवेश करुन रोग निर्मिती करते. पानामध्ये रोगनिर्मिती प्रक्रिया सुरु झाल्यापासून ३ ते ४ दिवसात पानावर रोगाचा प्रार्दुभाव दिसून येतो. प्रामुख्याने या रोगाचा दुय्यम प्रसार हवेमार्फत व पाण्यामार्फत होतो. तसेच या रोगाचा प्रसार बेण्यामार्फत अगदी कमी प्रमाणात होतो. काही ठिकाणी मॉन्सूनचा पाऊस संपल्यानंतर पानावर आढळणार्या रोगांचा प्रार्दुभाव कमी होत गेलेला आढळून येतो.

अनुकुल वातावरण : या रोगांची लक्षणे प्रामुख्याने जुलै ते डिसेंबर महिन्यापर्यत दिसून येतात. जुलै ते सप्टेंबर या काळात मॉन्सूनमुळे हवेतील सापेक्ष आर्द्रतेत ८०-९० टक्के वाढ, ढगाळ उष्ण व दमट वातावरण, वाहणारे वारे आणि सकाळचे धुके व पडणारे दव ही स्थिती रोग प्रसारास अनुकूल असते. रोगास बळी पडणाऱ्या जातीची लागवड, नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर, योग्य निचरा न होणारी जमीन, यामुळे सुद्धा या रोगाचा प्रसार होतो.

एकात्मिक नियंत्रण उपाय : वेळोवेळी ऊस पिकाचे सर्वेक्षण करून, रोगांची लक्षणे, तीव्रता व पिकाची अवस्था पाहून खालीलप्रमाणे उपाययोजना करावी. मॉन्सून हंगामामध्ये रोगाच्या प्रादुर्भावाबाबत ऊस पिकाचे सर्वेक्षण अथवा पाहणी करून प्रतिबंधक उपाय म्हणून शिफारसीत बुरशीनाशकाची फवारणी करावी. ऊस तुटून गेलेल्या जमिनीत पुनर्लागवड करायची असल्यास पूर्वी तुटून गेलेल्या उसाचे अवशेष गोळा करून त्यांचा नायनाट करावा. उसातील रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावी. निरोगी मळ्यातील रोगमुक्त बेणे लागवडीसाठी वापरावे.

रोगप्रतिकारक्षम जाती निवडून त्यांची लागवड करावी. उदा. को ८६०३२

योग्य निचरा होणार्या जमीनीत ऊस लागवड करावी. लागवडीसाठी रूंद सरी किंवा पट्टा पद्धतीचा अवलंब केल्यास उसामध्ये सूर्यप्रकाश व हवेचे प्रमाण वाढून रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. नत्राची मात्रा शिफारसीनुसारच द्यावी. पावसाळ्यात जास्त काळ पाणी साचलेल्या ऊस भागातील पाण्याचा निचरा करावा. पानांवरील तपकिरी ठिपके या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब अथवा कॉपर ऑक्सीक्लोराईड यापैकी कोणतेही एक बुरशीनाशक ०.३ टक्के (३ ग्रॅम प्रति लिटर पाणी) या प्रमाणात घेऊन १५ दिवसाच्या अंतराने स्टिकरचा वापर करून २-३ फवारण्या कराव्यात. उसावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यावर नियंत्रणासाठी ३ ग्रॅम/लि.पाणी मॅन्कोझेब किंवा टेबुकोन्याझोल १ मिली प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून १०-१५ दिवसांच्या अंतराने स्टिकरचा वापर करून २-३ फवारण्या कराव्यात. सामूहिक पद्धतीने रोगाचे नियंत्रण करावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५३ : थोरले माधवराव पेशवे यांचा रमाबाई यांच्याशी विवाह झाला.
१७५८ : मद्रास मध्ये सुरु झालेल्या तेरा महिन्यांच्या युद्धाला सुरुवात.
१८९२ : इंग्लिश फुटबॉल क्लब न्यूकॅसल युनायटेडची स्थापना झाली
१८९८ : बेलूर मठाची स्थापना झाली.
१९०० : लॉन टेनिसमधील 'डेव्हिस कप' स्पर्धांना सुरुवात झाली.
१९०० : अमेरिकेतील सर्वधर्म परिषदेत भाग घेऊन स्वामी विवेकानंद भारतात मुंबईमध्ये परतले.
१९२४ : हंगेरी आणि हॉलंड या दोन देशांमध्ये व्यापार करार झाला होता.
१९४१ : चीन ने जर्मनी, इटली, आणि जपान यांच्या विरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९४६ : दिल्लीमध्ये घटना परिषदेची पहिली बैठक.
१९६१ : पोर्तुगीज यांच्या ताब्यात असलेले दिव व दमण हे प्रांत भारतात समाविष्ट केले.
१९६१ : ब्रिटनपासुन स्वतंत्र होऊन टांझानिया देशाचा जन्म
१९६६ : बार्बाडोसचा संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश.
१९७१ : संयुक्त अरब अमिरातींचा संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश.
१९७५ : बारामती-पुणे थेट रेल्वेचा शुभारंभ.
१९९५ : बारामती-पुणे थेट रेल्वेचा शुभारंभ
१९९८ : शेन वार्न और मार्क वॉ या दोघांनी १९९४ मध्ये श्रीलंका दौऱ्यावर असताना एका पाकिस्तान सट्टेबाजा कडून काही रक्कम घेतल्याची कबुली केली.
२००२ : जॉन स्नो अमेरिकेचे नवीन अर्थमंत्री बनले.
२००६ : पाकिस्तान ने अणु क्षमता असलेले क्षेपणास्त्र हत्फ़-३ गजनवी चे यशस्वी प्रक्षेपण केले.
२००७ : पाकिस्तान च्या माजी प्रधानमंत्री बेनजीर भुट्टो यांनी पाकिस्तान सरकार सोबत पूर्णप्रकारे त्यांचे संबंध समाप्त केले.
२००८ : इस्त्रो ने युरोप च्या प्रसिद्ध कंपनी एडीएम एस्ट्रीयस साठी नवीन उपग्रहाचे निर्माण केले होते.
२०१३ : इंडोनेशिया मेंबिनटारो च्या जवळ एका ट्रेन अपघातात ६३ लोक जखमी झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५०८ : डच गणिती आणि नकाशे तज्ञ गेम्मा फ्रिसियस यांचा जन्म.
१४७८ : ला भारताचे प्रसिद्ध कवी संत सूरदास यांचा जन्म.
१६०८ : जॉन मिल्टन – कवी, विद्वान व मुत्सद्दी (मृत्यू: ८ नोव्हेंबर १६७४)
१८२५ : भारताचे प्रमुख नायक राव तुला राम यांचा जन्म.
१८६८ : फ्रिटझ हेबर – नायट्रोजनपासून मोठ्या प्रमाणावर अमोनिआ वायू मिळवण्याची पद्धत शोधल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळालेले (१९१८) जर्मन रसायनशास्त्रज्ञ. (मृत्यू: २९ जानेवारी १९३४ बाझेल, स्वित्झर्लंड)
१८७० : भारतीय डॉक्टर आणि मिशनरी आयडा एस स्कडर यांचा जन्म. (मृत्यू: २३ मे १९६०)
१८७८ : अण्णासाहेब लठ्ठे – कोल्हापूर संस्थानचे दिवाण व शिक्षणमंत्री (मृत्यू: १६ मे १९५०)
१८८९ : मध्ये आसाम मधील प्रथम असहयोगी चळवळीतील नेते चन्द्रनाथ शर्मा यांचा जन्म.
१९१३ : ला पहिली महिला फोटोग्राफर होमी व्यारावाला यांचा जन्म.
१९१८ : ला भारताचे प्रसिद्ध नाटककार कुशवाहा कान्त यांचा जन्म.
१९१९ : केरळचे मुख्यमंत्री ई. के. नयनार यांचा जन्म.
१९२२ : ला अमेरिकेचे हास्यकलाकार रेड फॉक्स्स यांचा जन्म.
१९२९ : ला प्रसिद्ध भारतीय कवी रघुवीर सहाय यांचा जन्म.
१९४६ : सोनिया गांधी – जन्माने इटालियन असलेल्या भारतीय राजकारणी
१९४६ : चित्रपट अभिनेते आणि खासदार शत्रुघ्न सिन्हा यांचा जन्म.
१९८१ : अभिनेत्री दिया मिर्झा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७६१ : हंबीरराव मोहिते यांच्या पुत्री ताराबाई यांचे निधन.
१९७१ : भारतीय नौसेना सैनिक महेंद्रनाथ मुल्ला यांचे निधन.
१९४२ : डॉ. द्वारकानाथ कोटणीस – हिंदी चिनी मैत्रीचे प्रतीक (जन्म: १० आक्टोबर १९१०)
१९९३ : चित्रपट अभिनेत्री स्नेहप्रभा प्रधान यांचे निधन.
१९९७ : के. शिवराम कारंथ – कन्नड लेखक, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणवादी, चित्रपट निर्माते आणि विचारवंत (जन्म: १० आक्टोबर १९०२ कोटा कर्नाटक)
२००७ : भारतीय लेखक त्रिलोचन शास्त्री यांचे निधन.
२००९ : प्रसिद्ध तबला वादक उस्ताद हनीफ मोहम्मद खान यांचे निधन.
२०१२ : बारकोडचे सहनिर्माते नॉर्मन जोसेफ वोंडलँड यांचे निधन. (जन्म: ६ सप्टेंबर १९२१).

## वाटाणा लागवड आणि व्यवस्थापन

राज्यात वाटाणा पिकाचे उत्पादन हे बडोदे, खान्देश, नगर, नाशिक, पुणे, सातारा या भागात मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. वाटाणा हे थंड हवामानात वाढणारे पीक असल्याने सरासरी तापमान १ ते १८ से तापमानात या पिकाची चांगली वाढ होते. कडाक्याची थंडी व धुके यांमुळे पिकावर दुष्परिणाम होतो. फुले येण्याच्या वेळेस उष्ण हवामान असल्यास शेंगांत बी भरत नसल्याने वाटाण्याची प्रत कमी होते. त्यामुळे योग्य वातावरण बघून या पिकाची लागवड करावी.

जमीन व पूर्वमशागत वाटाणा लागवडीसाठी मध्यम ते भारी चांगल्या निच-याची ५.५ ते ६.७ सामू असलेली जमीन निवडावी. वाटाणा पीक सर्व प्रकारच्या जमिनीत घेता येत असले,तरी हलक्या जमिनीत पीक लवकर तयार होते. हे पीक चांगले उत्पादनशील पीक असल्याने त्यासाठी पूर्वमशागत योग्य रीतीने करून जमीन भुसभुशीत करावी. पेरणीपूर्वी हेक्टरी २५ गाड्या शेणखत व पाणी द्यावे व वाफसा झाल्यावर पेरणी केल्यास उगवण चांगल्या प्रकारे होते.

लागवडीचा हंगामवाटाणा पिकाची वर्षातून दोन हंगामांत लागवड केली जाते. राज्यात हे पीक खरीप हंगामात जून-जुलैमध्ये तसेच हिवाळ्यात ठरते. वाटाण्याचे पीक हे एकदल पिकानंतरच घ्यावे. वाटाणा हे पीक वांगी, कांदा, टोमॅटो,बटाटा, कांदा अशा रोगाला मोठ्या प्रमाणात बळी पडणा-या पिकांनंतर घेऊ नये.वाटाण्याचे प्रकार व सुधारित जातीअ) बागायती किंवा भाजीचा वाटाणा (गार्डन पी)ब) जिरायती किंवा कडधान्याचा वाटाणा (फिल्ड पी)

सुधारित जाती -अरकेल : या जातीच्या शेंगा आकर्षक गर्द हिरव्या रंगाच्या असून साधारणपणे ६ ते ७ सेंमी. लांबीच्या असतात.

# महारक्तदान शिबीर कौतुकास्पद उपक्रम- सखारामदादा मस्के

## रक्तदान शिबीरातून जमा केलेला रक्ताचा थेंब न थेंब गरजूसाठी उपयोगी- निवृत्ती डोके





बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाटोदा बेलखंडी येथील पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा बेलखंडी येथे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री माननीय जयदत्तजी अण्णा क्षीरसागर साहेब यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी बाजार समितीचे माजी संचालक श्री सखाराम दादा मस्के, माजी संचालक निवृत्ती डोके सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य धनवंत मस्के सर अध्यक्षस्थानी होते तर गावचे माजी सरपंच चिमाजी बापू वाघमारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच या कार्यक्रमासाठी गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक व तरुण उपस्थित होते यामध्ये युवा कार्यकर्ते राहुल वाघमारे, सचिन वाघमारे, मंगेश माने, रवी काळे, श्रीकांत वाघमारे, महेश वनवे, जाधव दादा, गणेश वाघमारे, गणेश जाधव, संतोष मळेकर, एकनाथ जाधव इत्यादी अनेक कार्यकर्ते व तरुण याशिवाय शिबिरासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी संस्थेच्या संस्थापिका स्वर्गीय काकू व नाना यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोकातून अण्णांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सर्वदानात रक्तदान श्रेष्ठ असून या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मोठा आधार मिळणार आहे. अण्णांच्या कार्याचा आढावा व आण्णांचे सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक कार्य विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकासमोर सविस्तरपणे मांडण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य माननीय धनवंत मस्के सर यांनी अण्णांच्या कार्यामुळे परिसरात झालेला विकास व या विद्यालयांमध्ये शिकलेल्या विद्यार्थ्यांचा झालेले फायदे वेगवेगळ्या पदावर गेलेले विद्यार्थी व मुलींचे शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे सर्व काही माननीय अण्णा साहेबांमुळे कशाप्रकारे झालेला आहे याचं सविस्तर मार्गदर्शन अध्यक्ष साहेबांनी केले त्यानंतर अण्णांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयाचे प्राचार्य धनवंत मस्के सर यांच्या कल्पनेतून सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला त्यानंतर रक्तदानाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला विद्यालयामध्ये एकूण ३१ बॅकचे रक्तदान करण्यात आले रक्तदान केलेल्या व्यक्तींना अल्पउपार देऊन विद्यालयाच्या वतीने त्यांचा मानसन्मान करण्यात आला अशा पद्धतीने विद्यालयामध्ये भव्य असा हा कार्यक्रम पार पडला.





# जामखेड सौताडा रोडवर चालत्या चारचाकी वाहनाने घेतला पेट

जामखेड प्रतिनिधी

बीड वरुन जामखेड मार्गे नगरकडे जाणार्या चालत्या चारचाकी वहाणाने जामखेड सौताडा रोडवरील मोहा शिवारात अचानक पेट घेतला. घटनास्थळी पोलिसांच्या मदतीने नगरपरिषदेच्या अग्नीशमन गाडीने आग विझवण्यात आली मात्र तोपर्यंत सर्व गाडी जळुन खाक झाली होती.

यावावत पोलीसांन कडुन मिळालेली माहिती अशी की शनिवार दि ७ डिसेंबर रोजी वहानचालक जयदीप संपतराव सुरवसे रा. बीड. गाडी क्रमांक एम. एच ४६ एक्स २२६८ या चारचाकी वहानातुन आपल्या कामानिमित्त बीड वरुन नगरकडे रत्नागिरी या ठिकाणी चालले होते. यावेळी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांची गाडी जामखेड सौताडा रोडवरील मोहा शिवारातुन चालली होती.

यावेळी समोरुन येणाऱ्या एका ट्रॅक्टर चालकास या गाडीच्या बोनेटच्या बाजुने जाळ निघत आल्याचे लक्षात आले. त्याने ही माहिती आत बसलेल्या चालक जयदीप सुरवसे यांच्या लक्षात आणून दिली. यानंतर सुरवसे हे तातडीने गाडीतुन खाली उतरले त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र गाडीतील डीझेल मुळे या गाडीने मोठ्या

### गाडी जळुन खाक

प्रमाणात पेट घेतला. ही घटना जामखेड पोलीस स्टेशनला समजताच पो. कॉ. प्रविण इंगळे पळसे देवा, ज्ञानेश्वर बेलेकर पो. ना. सरोदे, मांडगे, घोळवे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांच्या मदतीने नगरपरिषदेच्या अग्नीशमन गाडीने आग आटोक्यात आणली मात्र तोपर्यंत पुर्ण गाडी जळुन खाक झाली. यानंतर जामखेड सौताडा रोडवर मोठ्या प्रमाणात ट्रॉफीक जाम झाले होते. घटनास्थळी मोहा येथिल माजी सरपंच शिवाजी डोंगरे व ग्रामस्थांनी पोलिसांना हवातुक सुरळीत करण्यास मदत केली.

गाडी चालक जयदीप सुरवसे यांनी सदरची गाडी तीन महिन्यांपूर्वीच विकत घेतली होती. २०१३ सालची ही गाडी आहे. ते आपल्या कामा निमित्त एकटेच रत्नागिरी या ठिकाणी चालले होते. सदरची आग गाडीतील वायरींगच्या शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र समोरुन येणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने ही घटना निदर्शनास आणून दिल्याने याचालकाचे प्राण वाचले व सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही.

## थोडक्यात



### इन्फंट इंडिया येथील मुलांना साहित्य वाटप

बीड: लोकनेते माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त इन्फंट इंडिया आनंदाश्रम मंझेरी फाटा येथील मुलांना अल्पोपहार साहित्य फळ वाटप तसेच थंडी निमित्त उबदार टोप्यांचे वाटप करण्यात आले.श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त इन्फंट इंडिया आनंदाश्रम मंझेरी फाटा येथील मुलांना खाऊ व साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी आश्रमाच्या संचालिका संध्याताई बारगजे, गजानन बँकेचे संचालक अरूण डाके, राजेश तांगडे, दत्तात्रय डोईफोडे, अर्जुन बहिरवाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव क्षीरसागर, व्यवस्थापक विलास कुंबेफळकर, अनंत अडसुळे, वैभव शेडोळकर, पठाण आय्युब, संतोष पिंगळे, अमोल डोईफोडे, गणेश आणेराव, महेश गुजर आदि उपस्थित होते.

### सुमनबाई भालेकर यांचे निधन

पिंपळवंडी : पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील सुमनबाई नाथा भालेकर यांचे दि.७/१२/२०२४ शनिवार रोजी अल्पशा आजार व हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले.त्यांचे वय ७० वर्ष होते.त्यांच्या जाण्याने पिंपळवंडी व पिंपळवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली.त्या शांत,संयमी व मनमिळावू स्वभावाच्या व धार्मिक वृत्तीच्या होत्या.त्यांच्या पार्थिवावर रविवार रोजी सकाळी १० वाजता पिंपळवंडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुले हरी, मच्छिंद्र, ज्ञानेश्वर व एक विवाहित मुलगी, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे. अंत्यसंस्कारला गुरुवर्य स्वामी महादेवानंद भारती महाराज तसेच समाजातील सर्व स्तरातील नागरिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, व्यापारी, लोकप्रतिनिधी, आजी-माजी सरपंच उपसरपंच, चेअरमन,ग्रामपंचायत सदस्य, नातेवाईक उपस्थित होते. भालेकर परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

### पाटोदा येथे दत्त जयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा येथे दिंडोरी प्रणित. श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने. परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आदेशानुसार श्री दत्त जयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह तसेच सामूहिक गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे सोमवार दिनांक ९ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत आयोजन करण्यात आले दरम्यान संपूर्ण आठवडाभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे पाटोदा या ठिकाणी श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने दत्त जयंती निमित्त सोमवार पासून सामूहिक गुरुचरित्र पारायण सोहळ्यास आरंभ होणार आहे तसेच सप्ताहामध्ये श्री स्वामी समर्थ मंत्राचा अखंड नामजप गायत्री मंत्र. महामृत्युंजय मंत्र. जप करून त्याची चित्रगुप्त वहीत नोंद होणार आहे त्याचबरोबर सप्ताह काळात देव देवतांच्या यागाचे आयोजन करण्यात आले आहे . तसेच केंद्राच्या वतीने पाटोद्यातील सर्व सेवेकरांना यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे .

# धारूर शहरात संत शिरोमनी संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी



धारूर । प्रतिनिधी

शहरात संत शिरोमनी संताजी महाराज जगनाडे ४०० वी जयंती तेली समाज बांधवानि मोठ्या उत्साहात साजरी केली जगनाडे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून, प्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरात दरवर्षी संत जगनाडे महाराज जयंती मोठ्या उत्सवात साजरी केली जाते यावर्षी जयंतीचे ४०० वे वर्ष असून यानिमित्त सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच ता.०८ रोजी सकाळी प्रतिमेचे पूजन करून प्रसाद वाटप करण्यात आला सर्व समाज बांधवानी एकत्र येऊन जयंती साजरी केली. संत जगनाडे महाराजांचे कार्य सूरज बोरगावकर व ज्ञानेश्वर शिंदे यांनी सर्व समजबांधवाना सांगत मनोगत व्यक्त केल व जयंती शुभेच्छा दिल्या यावेळी नागनाथ सोनटक्के,जगन्नाथराव सोनटक्के, उत्तरेश्वर कांबळे, बाळासाहेब सोनटक्के, राजाभाऊ बोरगावकर, सूरज कुमार बोरगावकर, बाळासाहेब बोरगावकर,विजय व्यवहारे, कैलास बोरगावकर, ज्ञानेश्वर शिंदे, दत्ता सोनटक्के, गंगाधर शिंदे, सुदर्शन साखरे, सचिन भालेकर, राहुल सोनटक्के, ज्ञानेश्वर सोनटक्के, सोमराज शिंदे, नितीन काळे, विलास राऊत, बाळू सोनटक्के, दत्ता भालेराव, महादेव भालेराव, रोहित सोनटक्के, प्रदीप शिंदे व इतर समाज बांधव उपस्थित होते.


# बीडमध्ये राज्य नाट्य स्पर्धेला सुरुवात

## सांस्कृतिक : मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून ७ डिसेंबरपासून महाराष्ट्रभर वेगवेगळ्या केंद्रावर ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला सुरुवात झालेली आहे. त्या अनुषंगाने बीड केंद्रावर यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे शनिवार (दि.७) डिसेंबरपासून महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला सुरुवात झाली.ही स्पर्धा येत्या १२ डिसेंबरपर्यंत रोज सायंकाळी ७ वाजत होणार आहे. अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी दिली.

या स्पर्धेचे उदघाटन ज्येष्ठ नाटककार डॉ.सतीश साळुंखे,ज्येष्ठ रंगकर्मी कुलदीप धुमाळे,ज्येष्ठ रंगकर्मी राजहंस सर,स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे,प्रा.तन्मय शेटगार,पत्रकार सुनिल डोंगरे, प्रा.केशव भागवत,पत्रकार प्रतीक कांबळे,रंगकर्मी लक्ष्मीकांत दोडके,जतिन



वाघमारे व या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लाभलेले राजा अत्रे सर,प्रतिभा पाटील,सुधाकर पाटील यांच्या हस्ते झाले.महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला, बीडच्या नाट्य रसिकांनी उपस्थित राहून नाटकांचा आनंद घ्यावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे. दरम्यान समन्वय म्हणून समितीचे समन्वयक मुकुंद धुताडमल,सह समन्वयक प्रा.प्रविण निसर्गंध,प्रवीण राठोड,वैभव निवारे, प्रा.अक्षय कोकाटे,प्रदीप मनोहर,राहुल राऊत,पवन नाईकनवरे,अरविंद ढोकणे कामकाज पाहत आहेत.

**सादर होणारी नाटके :** शनिवार दि.७ डिसेंबर रोजी ''अचानक'',दि.८ डिसेंबर रोजी ''दुष्काळ'',दि.९ डिसेंबर रोजी ''अजूनही उजाडत नाही'',दि.१० डिसेंबर रोजी ''द ॲनॉमली'',११ डिसेंबर रोजी ''शोध निर्मुलनाचा'', दि.१२ डिसेंबर रोजी ''दृष्टी'' ही नाटके रोज सायंकाळी ७ वाजता सादर होणार आहे.

# डॉ. आंबेडकरांचे विचार कृतीतून जगणे हेच त्यांना अभिप्रेत अभिवादन ठरू शकेल-ॲड.शिंदे

बीड । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ॲड. राजेश शिंदे मित्र परिवाराच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सर्वत्र कॅन्डल लावून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सर्वत्र कॅन्डल प्रज्वलित करून बाबासाहेब आंबेडकरांना पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यानंतर सामूहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विक्रम धनवे, व्याख्याते अभिषेक साळुंखे उपस्थित होते. सलग नऊ वर्ष झाले मित्रपरिवाराच्यावतीने कॅन्डल मार्च व अभिवादन सभेचे आयोजन करण्यात येते.

याप्रसंगी ॲड. राजेश शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरती

### ९ व्या कॅण्डल अभिवादन सभेत व्यक्त केले विचार

उपस्थितांना मार्गदर्शन करत असताना सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार ही देशासाठी प्रेरणा असून बाबासाहेब आंबेडकरां एवढा देशप्रेमी या देशात दुसरा कोणीही होऊ शकत नाही. सबंध आयुष्यात बाबासाहेबांनी दिलेले विचार हे देशासाठी दिशादर्शक असून संविधानाने दिलेल्या अधिकारांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. तरुणांनी बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या मार्गावर चालताना समाज परिवर्तनासाठी लढा देणे गरजेचा आहे. तसेच याप्रसंगी बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली पाच पुस्तक वाचण्याचा संकल्प देखील उपस्थित सर्वांनी केला. पुढे प्रमुख पाहुणे प्रा.विक्रम धनवे यांनी बाबासाहेबांच्या जीवनावरती प्रकाश टाकताना उपस्थित त्यांना सविस्तर मार्गदर्शन करताना बाबासाहेबांना जगणे हे खूप महत्त्वाचे आहे दुःख हे अंतिम सत्य असून आपल्या स्वतःला आपणच प्रकाशमान केले पाहिजे असा संदेश त्यांनी याप्रसंगी दिला. याप्रसंगी प्रा. विक्रम धनवे,व्याख्याते अभिषेक साळुंखे, ॲड. तेजस वडमारे, राजू इनामदार, रुग्ण सेवक कपिल जोगदंड, शरद झोडगे, मल्हारी जाधव, महेश भोसले, रजनीकांत वाघमारे, मनोज शिंदे, सिद्धार्थ पवळे, सोनू पवळे,अरविंद जाधव, श्याम जाधव, करन जाधव यांच्या सह ॲड. राजेश शिंदे यांचा मित्र परिवार मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

# सुरेश धस यांना मंत्रिमंडळात समाविष्ट करा-भरत घोलप

आष्टी। प्रतिनिधी

आत्ताच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला दणदणीत यश संपादन झाला असून महायुतीमध्ये सर्वाधिक जागा जिंकून भारतीय जनता पार्टी सर्वात मोठा पक्ष ठरला आहे याच पक्षातील एक रांगड व्यक्तिमत्व ज्यांना प्रत्येक घटकाची जाण आहे शेतकऱ्याच्या विविध प्रश्नांवर त्यांनी आपल्या मागच्या कार्यकाळामध्ये फार मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्गाला देण्याची काम केले आहे दरवाढी प्रश्न असेल अथवा दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांची जनावरी वाचवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर चारा छावण्या सुरू केल्या असे आष्टी विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर तब्बल ८० हजाराच्या निवडून आलेले सुरेश रामचंद्र धस यांना



महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये स्थान देऊन त्यांनी केलेल्या मागच्या ३५ वर्षाच्या राजकारणातील संघर्षाला न्याय मिळाल्यासारखे होईल अशी मागणी चिखली येथील युवा कार्यकर्ते भरत घोलप यांनी केली आहे.

गावचा सरपंच ते महाराष्ट्र मंत्रिमंडळात आठ खात्याची मंत्री पदाची जबाबदारी स्वीकारणारे तसेच बीड उस्मानाबाद लातूर या मोठ्या विधान परिषदेच्या जागेवर देखील मोठ्या फरकाने निवडून आलेले धस सुरेश रामचंद्र हे एक बीड जिल्ह्याला लाभलेलं सर्व जातीला सोबत घेऊन चालणार प्रत्येक घटकाला न्याय देणारं असं रांगडे व्यक्तिमत्व असून त्यांना उद्या होणाऱ्या महाराष्ट्र मंत्रिमंडळात मानाचे स्थान देऊन त्यांचा कार्याचा गौरव करावा अशी मागणी घोलप यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच केंद्रीय संरक्षण मंत्री अमित भाई शाह यांच्याकडे केली आहे.

# महिला कला महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

बीड। प्रतिनिधी

येथील माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व दिनविशेष समितीद्वारे दि.०६/१२/२०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर आणि दिनविशेष समिती प्रमुख डॉ.बबन बोबडे यांची विचार मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बबन बोबडे यांनी केले प्रस्ताविकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची व ०६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी सांगितली.



अध्यक्षीय समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेश मध्ये महू येथे झाला.०६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतला. डॉ. बाबासाहेब भारतीय संविधानाचे शिल्पकार, दलितांचे कैवारी, अन्याय विरुद्ध लढणारे होते. त्यांनी महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. बाबाबासाहेब आंबेडकर एक अग्रगण्य कार्यकर्ते आणि समाज सुधारक होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर . २१व्या शतकातील सगळ्यात विद्वान व्यक्तिमत्व म्हणून त्यांना कोलंबिया विद्यापीठात गौरविले. पाशि्चमात्य देशात बाबासाहेबांना म्हणून ओळखले जाते. अमेरिका द्वारा म्हणून ओळख आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध, फुले ,संत कबीर यांना गुरू मानले आणि त्यांच्याच विचारांची छाप त्यांच्या चळवळीत, लिखाणात दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एक व्यक्ती एक मूल्य, मतदानाचा अधिकार, अर्थशास्त्र, मजुरांच्या कामाचे तास निर्धारित करणे, पाणी प्रश्न इत्यादी बाबींवर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.बबन बोबडे ( रासेयो कार्यक्रमाधिकारी व दिनविशेष समिती प्रमुख) यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींनी उपस्थित होते.

# कडा बस स्थानकात घाणीचे साम्राज्य, प्रवाशांचे आरोग्य धोक्यात

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यापुर्वी येथील बसस्थानकात स्वच्छतागृह नसल्याने महिलासह, शाळा महाविद्यालयीन मुलीची व पुरूषाची कुंचबना होत होती.त्यानंतर काही दिवसांनी बसस्थानकात सुलभ शौचालय उभारण्यात आले.पण आता याकडे आगारप्रमुखाचे दुर्लक्ष असल्याने पाठीमागील बाजूस व समोर घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याने कडा बसस्थानकातील सुलभ शौचालयाला घ्णीचा विळख्यात गेल्याने व्यावसायिकासह प्रवाशांना नाकाला रूमाल बांधून बसण्याची वेळ आली आहे.



मराठवाड्याचे प्रवेश द्वार असलेले आष्टी तालुक्यातील कडा हे बसस्थानकात आहे.याच बसस्थानकावर लांब पल्यासह आडणारी बस मोठ्या प्रमाणावर धावतात.तसेच प्रवाशाची देखील सारखी वर्दळ असते.शाळा,महाविद्यालयातील मुली,मुले याची देखील मोठी संख्खा असते.या ठिकाणी स्वच्छतागृह नसल्याने प्रवाशांची मोठी कुचंबणा होत होती.प्रवाशाच्या मागणीवरून वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर याठिकाणी सुलभ शौचालय उभारण्यात आले.पण आता मागील काही दिवसांपासून पाठीमागील बाजूस मोठा खड्डा झाल्याने तो उघडा असल्याने व समोरील बाजुने देखील उघडा खड्डा असल्याने घाणचे साम्राज्य निर्माण झाले आहे.याकडे आगार प्रमुखाचे दुर्लक्ष असल्याने व्यावसायिकासह प्रवाशांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.या घाणीची त्वरित विल्हेवाट लावावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते बापू आहेर यांनी केली आहे.

# कांदे विक्रीसाठी घेऊन गेलेला तरुण बेपत्ता

## गेल्या पंधरा दिवसापासून शोध घेऊनही सापडेना

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव अंतर्गत असलेल्या आंबेवाडी येथील तरुण हा अहिल्यानगर येथे कांदे घेऊन विक्री करण्यासाठी मार्केटला गेला होता. परंतु तो तेथून गायब झाला आहे. शोधाशोध करून देखील तरुणाचा शोध लागत नसल्याने अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशनला हरवला असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की ब्रह्मगाव अंतर्गत असलेल्या आंबेवाडी येथील गहिनीनाथ सर्जेराव आगलावे (वय ४०) वर्षे हा तरुण आपल्या शेतात पिकवलेला कांदा दि. ३० नोव्हेंबर रोजी रात्री ८ :०० वाजता रोजी विक्री करण्यासाठी अहिल्यानगर येथील नेप्ती मार्केटला गेला होता. परंतु तो अद्याप पर्यंत घरी परत आला नाही. त्यामुळे संबंधित तरुणाचा मुलगा ऋषिकेश गहिनीनाथ आगलावे यांनी अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशन येथे हरवला असल्याची तक्रार दाखल केली आहे. याबाबत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, दिनाक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ०८.०० वा माझे वडील हे आमच्या शेतात पिकलेला कांदा घेवुन अहिल्यानगर येथे विकण्यासाठी किरण नरवडे यांचे पिकअप गाडीमध्ये घेवुन आले होते. त्यावेळी आमच्या गावातील अजिनाथ डोंगरे व महेश पवार हे ही आले होते. त्यावेळी गावातील वरील सर्वजण घरी परत आले परंतु माझे वडील गहिनीनाथ हे त्याचेसोबत आले नाहीत. त्यामुळे मला व आईला वाटले की, ते आहिल्यानगर येथे मुक्कमी राहिले असावेत असे वाटले त्यामुळे आम्ही त्यांची चौकशी केली नाही. त्यानंतर आम्ही कांदा मार्केट येथील व्यापारी अशोक ढाकणे यांचे कडे चौकशी केली त्यावेळी त्यानी सांगितले की, त्यांनी माझ्याकडुन ५०० रूपये उचल घेतली व त्याच रात्री येथुन गेले ते परत माझ्याकडे आले नाही. मी व माझे इतर नातेवाईकांनी त्याचा नातेवाईकडे चौकशी केली असता मिळून आले नाही. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे. नाव -गहिनीनाथ सर्जेराव आगलावे वय ४० वर्ष रा ब्रम्हगाव ता. आष्टी जि बीड मोबाईल नाही. उंची ६ फुट, शरीराने बांधा मध्यम रंगाने निमगोरा, नाक सरळ, केस काळे, अंगात पांढ-या रंगाचा लाईन असलेला शर्ट पैन्ट काळी गळ्यात तुळशीची माळ, पायात बुट काळा या वर्णनाचा व्यक्ती आढळून आल्यास अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशन ला संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# जनतेने आता विकास कामावर लक्ष ठेवावे -ॲड. अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये कधी नाही तेवढा पैसा खर्च होताना जनतेने पाहिला. आता हा पैसा परत काढण्यासाठी राजकीय चळवळ उभी राहील. त्यामुळे सामान्य जनतेने आता आपापल्या भागातील विकास कामे होतात का ? याकडे लक्ष केंद्रित करावे. त्या त्या परिसरातील चांगल्या कार्यकर्त्यांची फळी उभी करून विकास काम चांगल्या दर्जाचे करून घेऊन देश उभारणीच्या कार्याला हात लावावा, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

एका छोटेखानी कार्यक्रमात ते कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. राज्यातील विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. त्यानंतर एक शपथविधी कार्यक्रम झाला. आणखी अनेक शपथविधीचे कार्यक्रम होतील. प्रत्येक नागरिकाला आता आपापल्या परिसरातील विकास कामाकडे लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. जोपर्यंत नागरिक दक्ष होत नाही, तोपर्यंत विकास काम चांगल्या दर्जाचे होणार नाही.

बोकाळलेला भ्रष्टाचार थांबवणे, हे प्रशासन यंत्रणेला शक्य होईल, असे चित्र दिसत नाही. कारण प्रशासनातील भ्रष्ट प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आहेत. गप्पा मारताना समाज परिवर्तन आणि देशाच्या उभारणीच्या मारायच्या. मात्र प्रत्यक्ष काम करताना भ्रष्टाचार रोखण्यासाठी पुढे यायचे नाही. ही प्रवृत्ती आता शासन आणि प्रशासनात वाढलेली आहे. सामान्य नागरिकांच्या गरजा अत्यंत कमी असतात. त्या गरजा पूर्ण करणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र नागरिक जेव्हा आपल्या अधिकाराची मागणी करतो, त्याच वेळेला हक्काची देखील मागणी केली जाते. अनेक योजना हक्काने मागण्याचा अधिकार नागरिकांना आहे. मात्र आता घटनेने दिलेल्या हक्क आणि अधिकारा बरोबर नागरिक म्हणून देखील आपले जे कर्तव्य आहे, ते निभावण्याची वेळ आली आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने दक्ष राहून आपले गाव, तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर कोणकोणत्या योजना येत आहेत, त्या जनतेपर्यंत पोहोचतात का ? आपला हक्क आपल्या पदरी पडत आहे का ? या सर्व मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक गावातील कार्यकर्त्यांनी तरुणांची एक फळी निर्माण करून सर्व समावेशक असे काम करणे गरजेचे झाल्याचे मत व्यक्त करत भ्रष्ट लोकांवर अंकुश ठेवण्यासाठी जनतेने पुढे येण्याचे आवाहन ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

# वर्णी महापूजेने श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष महोत्सावास प्रारंभ

## यंदाही मंदिरात आराध बसण्यासाठी मंदिर प्रशासनाची तगडी तयारी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान व अंबाजोगाईचे ग्रामदैवत असलेल्या श्री योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत साजरा होत आहे. रविवारी सकाळी वर्णी महापूजेने मार्गशीर्ष महोत्सवास प्रारंभ झाला. तहसीलदार विलास तरंगे व सौ मयुरी तरंगे यांनी योगेश्वरी देवीची विधीवत महापूजा केली. या वर्णी महापूजेने या महोत्सवास प्रारंभ झाला.



मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग नऊ दिवस आराध बसण्याची परंपरा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे. या वर्षी देखील मंदिरात जवळपास ४ ते ५ हजार महिला आराध बसणार असल्याची माहिती देवल कमिटीच्या वतीने देण्यात आली. रविवारी सकाळी झालेल्या महापूजेनंतर महिलांची मंदिरात आराध बसण्यासाठी गर्दी वाढू लागली होती. शहर वासियांनी योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा केल्या होत्या. या वेळी झालेल्या महापूजेला तहसीलदार तथा देवल कमिटी चे अध्यक्ष विलास तरंगे,व सौ. मयुरी तरंगे यांनी विधिवत योगेश्वरी देवीची महापूजा व महाआरती केली. यावेळी देवल कमिटीचे सचिव प्रा.अशोक लोमटे, कोषाध्यक्ष शिरीष पांडे, विश्वस्त संजय भोसले,डॉ.संध्या जाधव,अमोल लोमटे,सतीश लोमटे, प्रवीण दामा,हंसराज देशमुख,राजपाल भोसले, देवीचे पुजारी सारंग पुजारी, योगेश्वरी देवीचे पुरोहित,मानकरी व भक्त उपस्थित होते. यावेळी पुरोहितांच्या मंत्रोच्चारात व विधीवत महापूजेनंतर महाआरती झाली. महोत्सवाच्या कालावधीत सलग नऊ दिवस विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन देवल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. पान ३ वर

# माजी मंत्री जयदत्त आण्णांच्या वाढदिवसानिमित्त गजानन विद्यालयात ३० जणांनी केले रक्तदान

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

लोकनेते माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.



आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शनिवार दि.७ डिसेंबर रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रथम स्व.केशरकाकू क्षीरसागर आणि स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्रा.केशव भांगे यांनी आपल्या भाषणातून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे या विषयी सविस्तर मार्गदर्शन करून आण्णासाहेबांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार क्षेत्रातील कार्याविषयी माहिती दिली. या प्रसंगी अरूण डाके, अच्युत मोरे, हनुमान जगताप, मारूती वाघ, अनिल बहीर, ज्ञानेश्वर केंडे, जानबा पवार, वैजिनाथ बनकर, सचिन पवार, रामचंद्र पान ३ वर

# सर्वसमावेशक नेतृत्व असलेले आ.सुरेश धस यांना कबीनेट मंत्री करा- आरिफ शेख

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राजकारणात कधीच जाती-पातीचे राजकारण न करता आणि मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रश्नांचा त्यांना जाण असलेले मतदार संघाचा अत्यंत बारकाईने अभ्यास करून



विकासाचं दूरदृष्टी असलेले नेतृत्व आ.सुरेश धस यांना भारतीय जनता पार्टीने जनसामान्यांच्या मताचा आदर करीत योग्य ते स्थान देत नवीन मंत्री मंडळात संधी द्यावी अशी मागणी कडा येथील ग्रामपंचायत सदस्य आरिफ शेख यांनी केली आहे.

आष्टी,पाटोदा,शिरुर विधानसभा मतदार संघात ग्रामीण भागातील जनतेशी अतिशय घट्ट अशी नाळ जुळली आहे हे कालच्या निकालावरून सिद्ध झाले आहे. आघाडी सरकारच्या काळात त्यांनी महसूल व पुनर्वसन सह अनेक खात्याचे राज्य मंत्रीपदसुद्धा भूषविले आहे.आ.सुरेश धस यांनी मंत्रिपदाच्या काळात अतिशय उत्तम असे काम केलेले आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सुरेश धस पान ३ वर

# लाडकी बहीण योजनेत नोंदणीसाठी एक संधी मिळावी -शंकर देशमुख

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेत वंचित माता भगिनीना नोंदणी साठी एक संधी मिळावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केली आहे



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात मागणी करताना देशमुख यांनी म्हटले आहे या योजनेमुळे अनेक गरजू महिलांना दैनिक खर्चासाठी आधार झाला आहे परंतु मागील सरकारच्या काळात नोंदणी साठी मुदत व मुदत वाढवून दिली होती तरी ही या कालावधीत देखील काही गरवंत महिला या योजनेत नोंदणी करु शकल्या नाहीत ज्यात कागदपत्रे,ॲप न चालने ,नेटवर्क रेज नसने व काही स्थलांतरित अशा विविध कारणांमुळे यामघुन वंचित राहिल्याने त्या नोंदणी करु शकल्या नव्हत्या त्या माताभगिणी नोंदणीसाठी एक संधी मिळावी अशी मागणी करत आहेत आणि म्हणून मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेत नोंदणी करण्यासाठी एक १५ दिवसांची संधी उपलब्ध करुन द्यावी

अशी मागणी शंकर देशमुख यांनी केली व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करुन १५०० रु २१०० लाडकी बहिण योजनेतील अनुदानात वाढ करणार असल्याच्या घोषणेचे अभिनंदन निवेदनाद्वारे केले आहे

# घाटनांदुर येथे खंडोबा यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमासह जंगी कुस्त्याची दंगल संपन्न

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे खंडोबा यात्रेनिमित्त दिनांक ६ डिसेंबर रोजी संध्याकाळी नऊ वाजता वाघ्या मुरळीचा कार्यक्रम संपन्न झाला व तसेच७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता खंडोबाच्या मानाच्या काठीची मिरवणूक वेळी धनगरी पारंपारिक वाद्य वारू भक्त मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच दुपारी तीन वाजता कुस्त्याच्या दंगल ला सुरुवात झाली या कुस्त्यांच्या दंगल मध्ये कुमारी ऋतुजा हनुमंत शिंदे रा होळ या मुलीने मुलाबरोबर कुस्तीची दंगल खेळून बाजी मारून जिंकल्या नंतर खंडोबा देवस्थान कमिटी यांच्यावतीने कुमारी ऋतुजा शिंदे



या मुलीचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला या कुस्त्यांच्या दंगल मध्ये मोठ्या संख्येने बाहेरगाहून आलेले पैलवान व नागरिक उपस्थित होते या कुस्तीच्या मैदानामध्ये ५० रु पासून ते ५ हजारा रुपये पर्यंत बक्षीस खंडोबा देवस्थान कमिटी घाटनांदुर यांच्यावतीने देण्यात आले होते या शेवटीच्या कुस्त्याच्या दंगल मध्ये नितीन मुंडे रा लाडझरी व दिपक कराड रा रामेश्वर या दोन पैलवानांची निवड करण्यात आली होती या शेवटच्या कुस्ती दंगल मध्ये पैलवान दिपक कराड रा.रामेश्वर हे विजेते झाल्यामुळे त्यांना पाच हजार रुपये बक्षीस व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला या सर्व कार्यक्रमाचे नियोजन खंडोबा देवस्थान कमिटी घाटनांदूर यांच्या वतीने करण्यात आले होते यावेळी सरपंच महेश गारटे, नेताजी देशमुख, रंगनाथ गाडवे, उत्तम गाडवे, सौदागर वैद्य, गोविंद वैद्य, गोपाळ गाडवे, संतोष गाडवे,रामभाऊ वैद्य, पवन दरगड, रणजीत पाटील, बालासाहेब राजमाने, व्यंकटी गाडवे, रामभाऊ वालेकर, प्रदीप वैद्य, प्रताप गीते,किरण वैद्य, व सर्व खंडोबा देवस्थान कमिटी , घाटनांदुर व परिसरातील गावकरी मंडळी, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीदत्त जयंतीनिमित्त पुस येथे ९ ते १५ डिसेंबर या कालावधीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री दत्त जयंतीनिमित्त मौजे पुस (ता.अंबाजोगाई) येथील श्री क्षेत्र दत्त मंदिर येथे ९ ते १५ डिसेंबर या कालावधीत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील मौजे पुस येथे श्री दत्त जयंतीनिमित्त श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा सोमवार, दि.०९ डिसेंबर ते रविवार, दि.१५ डिसेंबर २०२४ रोजी पर्यंत करण्याचे योजिले आहे. यावेळी भागवत कथाकार ह.भ.प.कांतादेव महाराज वडगाव (दादाहरी) यांना अशोक महाराज गित्ते-नंदागौळ, ह.भ.प.अंकुश महाराज पुरी व तबला वादक ह.भ.प.बंकटकुमार बैरागी, ह.भ.प.अशोक महाराज गायके यांची साथसंगत लाभणार आहे. दैनंदिन कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहे. सकाळी ६ ते ७ अभिषेक व आरती, ७ ते ११ गुरूचरित्र पारायण, १ ते ४ भागवत कथा, ४ ते ६ महाप्रसाद, सायं.६ वाजता आरती होणार आहे. १४ डिसेंबर रोजी दत्त जयंतीनिमित्त सायंकाळी ४ ते ६ या वेळेत ह.भ.प.भुषण महाराज तळणीकर (मोहगाव) यांचे दत्तजन्माचे किर्तन व पालखी सोहळा संपन्न होईल. श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची सांगता रविवार, दि.१५ डिसेंबर २०२४ रोजी ह.भ.प.प्रेममुर्ती महेश महाराज माकणीकर यांचे काल्याचे किर्तन व नंतर सार्वजनिक गांवकरी मंडळींच्या महाप्रसादाने होईल. यावेळी गायनाचार्य ह.भ.प. कैलास महाराज मुरकुटे, आप्पा महाराज पट्टीवडगांवकर, अंकुश महाराज पुरी-घाटनांदूरकर, अशोक काका गित्ते-नंदागौळ, मृदंगाचार्य बंकटकुमार वैरागी, अशोक गायके-पुसकर तसेच पंचक्रोशीतील नामवंत व गुणीजन भजनी मंडळ उपस्थित राहतील. श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजनासाठी समस्त गावकरी मंडळ पुस यांनी पुढाकार घेतला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.०९ डिसेंबर २०२४ । पान ७

# शरद पवारांनी पराभव मान्य करावा, जनतेचा कौल मान्य करावा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**शिरुर । प्रतिनिधी**

शरद पवार हे राजकारणाचा ५० वर्षापेक्षा जास्त प्रदीर्घ अनुभव असलेले जेष्ठ नेते आहेत. त्यामुळे अशा नेत्यांनी संयमाने वागायच असत व पराभव स्वीकारायचा असतो. शरद पवारांनी जनतेचा कौल मान्य करावा. लोकांचं ऐकावं, कार्यकर्ते व खोटं सांगणाऱ्या नेत्यांचं ऐकू नये असा सल्ला राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांना दिला.



शिरुर तालुक्याच्या बेट भागातील टाकळी हाजी येथे सुद्रिक यांच्या विवाहनिमित्त आशिर्वाद देण्यासाठी राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. फडणवीस म्हणाले, बबनराव सुद्रिक आणि त्यांच्या कुटुंबाचे व माझे चांगले संबंध आहेत. एका वाईट घटनेनंतर त्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी आम्ही सर्वजण राहिलो. त्यामुळे जवळीकता झाली आहे. त्यांच्या घरातील विवाहसोहळ्यानिमित्त त्यांच आमंत्रण आल्यानंतर मी त्यांना विवाहाला नक्की येईल असे सांगितले होते. त्यामुळे मी आशीर्वाद देण्यासाठी आलो होतो. यावेळी आमदार प्रविण दरेकर तसेच माजी आमदार राम शिंदे हे सुद्धा उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, पराभव का झाला हे पवार साहेबांना महिति आहे. परंतु कार्यकर्त्यांच्या दबावावाखाली शरद पवार वागत असतील तर अशान सर्वसामान्य लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडेल. लोकशाही प्रक्रियेवरील लोकांचा विश्वास उठेल अशी कार्यवाही किमान शरद पवार यांनी करु नये. अबू आझमी व सपा भाजपाची 'बी टीम' आहे असा आरोप माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी केला होता. यावर बोलण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी यावेळी टाळले.

## फायनान्स कंपनीच्या त्रासाने संपवलं आयुष्य; घर गहाण ठेवूनही कर्ज देण्यास नकार



तळेगाव ढमढेरे (ता. शिरूर) येथील एकाला फायनान्स कंपनीने कर्जासाठी घर गहाण ठेवून घेत नियमानुसार सुरवातीचे काही हप्ते भरून घेतले. परंतु, कर्ज न देता त्रास दिल्याने हरिभाऊ गायकवाड (वय ५३) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. शिक्रापूर पोलीस ठाण्यात याप्रकरणी महिंद्रा फायनान्स कंपनीचे सूरज दिलीप पवार व महेंद्र पाटील या दोघांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत शीतल गायकवाड (वय ४३) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तळेगाव ढमढेरे येथील हरिभाऊ गायकवाड यांना व्यवसायासाठी कर्ज घ्यायचे असल्याने त्यांनी शिक्रापूर येथील महिंद्रा फायनान्स कंपनीमध्ये सूरज पवार व महेंद्र पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर फायनान्स कंपनीला घराचे कागदपत्र देत घराचे गहाणखत करून दिले. कंपनीने त्यांना प्रोसेसिंग फी म्हणून काही हप्तेदेखील भरण्यास सांगितले. परंतु, कर्जाच्या रकमेचा चेक गायकवाड यांना दिला नाही. त्यानंतर ते वेळोवेळी फायनान्स कंपनीत गेले असताना त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. गायकवाड यांना पुणे येथील कार्यालयात बोलावून घेऊन कर्ज देणार नाही आणि घराचे गहाणखत बदलणार नाही अशी धमकीही दिली. याप्रकरणी पोलिसांनी सूरज पवार व महेंद्र पाटील यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती हवालदार अमोल चव्हाण यांनी दिली.

## हिवाळी अधिवेशनात बांधकाम कामगार काढणार नागपूरमध्ये मोर्चा

**पिंपरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट पद्धतीने करण्यात आली असून विधानसभेच्या आचारसंहितेपासून अजूनही सर्व कामकाज बंद आहे तसेच ऑनलाइन पद्धतीने काम सुरू होण्यासाठी तसेच महाराष्ट्र राज्यातील २६ लाख बांधकाम कामगारांचे अर्ज तात्काळ निकाली काढावेत या व विविध मागण्यासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये बांधकाम कामगारांचा मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती कामगार नेते काशिनाथ नखाते यांनी दिली .

महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार समन्वय समिती, कष्टकरी संघर्ष महासंघतर्फे राष्ट्र सेवा दल पुणे येथील सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्यातील बांधकाम कामगारांच्या प्रमुख प्रतिनिधीची राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी येत्या हिवाळी अधिवेशनात नागपूर आंदोलनाचा ठरावासह इतर ठरावही मंजूर करण्यात आले . यावेळी साथी सागर तायडे, कॉ. शंकर पुजारी, कामगार नेते काशिनाथ नखाते,नवी मुंबईच्या विनिता बाळेकुंद्री, वर्धाचे प्रशांत रामटेके, यवतमाळचे रत्नदीप डोके,अकोल्याचे परशुराम मेश्राम, नांदेडचे परमेश्वर मठपती सोलापूरचे प्रदीप परकाळे, कोल्हापूरचे राजू सुतार,बीडच्या अनिता जाधव,बुलढाण्याचे चांद शाहा, लातूरचे विजय जाधव यांचे सह विविध प्रतिनिधी उपस्थित होते. प्रस्तावना सागर तायडे यांनी तर आभार राजेश माने यांनी मानले.



### काय आहेत मागण्या?

बांधकाम कामगारांची नोंदणीबाबत शासन आणि महामंडळ जाणीव जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून बांधकाम कामगार योजनेच्या केवळ जाहिराती केल्या जात आहेत प्रत्यक्षात लाभ मात्र मिळत नाही. दिवाळीला बोनस जाहीर केला आणि प्रसिद्धी मिळवली मात्र प्रत्यक्ष कामगारांना काहीच मिळालेले नाही आता बोनस देण्यात यावा. विविध योजना या पूर्णतः थंडावल्या असून नोंदणी व नूतनीकरण न झाल्याने दरम्यानच्या कालावधीत कामगारांचा अपघाती मृत्यू झाला तर याला महामंडळ आणि शासन जबाबदार असेल. महाराष्ट्र राज्यातील नोंदणी कामे तालुक्याला केंद्र निर्माण केलेले असून सदरच्या ठिकाणातून किरकोळ प्रमाणात नोंदणी होणार आणि पिळवणूक होणार असून प्रत्येक जिल्ह्यातील कामगारांची संख्या पाहिली असता नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी खुल्या पद्धतीने होणे अत्यंत गरजेचे आहे. असे न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. विविध जिल्हा प्रतिनिधींनी आपल्या समस्या यावेळी मांडल्या.

## बोगस पदवीद्वारे महापालिकेत घेतली पदोन्नती

**पुणे । प्रतिनिधी**

परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्यांच्या आधारे पिंपरी-चिंचवड महापालिकेत अनेक अधिकारी व कर्मचार्यांनी वरिष्ठ पदावर पदोन्नती मिळविल्या आहेत. अशा अधिकारी व कर्मचार्यांवर महापालिकेकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. सामान्य प्रशासनाकडून बघ्याची भूमिका घेतली जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहेत.

महापालिकेच्या सेवा प्रवेश नियमावलीनुसार वर्ग तीन व चारमधील पात्र कर्मचार्यांना कनिष्ठ अभियंतापदावर पदोन्नती देण्याची तरतूद आहे. या नियमाच्या आधारे गेल्या दहा वर्षांत महापालिकेत रखवालदार, मजूर, गवंडी, बिगारी, शिपाई, लिपिक, आरोग्य निरीक्षक, सर्व्हेअर अशा कर्मचार्यांना कनिष्ठ अभियंता, स्थापत्य




अभियांत्रिकी सहाय्यक होण्याची संधी मिळाली आहे. ही पदोन्नती मिळविताना अनेक कर्मचार्यांनी कर्नाटक, आसाम, सिक्कीम, राजस्थान, केरळ या परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्या घेतल्या आहेत. कर्मचार्यांनी बहि:स्थ पध्दतीने शिक्षण घेऊन या पदव्या मिळवल्या आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आदेशानुसार अभियांत्रिकीसह, वैद्यकीय, कृषी, आरोग्य, हॉटेल मॅनेजमेंट, कायदा आदींच्या दूरस्थ शिक्षणाला परवानगी नाही. संबंधित विद्यापीठांना इतर राज्यांतील विद्यार्थ्यांना अशा पदव्या देण्याचे अधिकार नाहीत. असे असताना या परराज्यातील विद्यापीठांकडून बोगस पदव्यांची खैरात सुरू आहे. त्याच पदव्यांच्या आधारे महापालिकेने अनेक कर्मचार्यांना पदोन्नती दिल्या आहेत.

### फौजदारी गुन्हे दाखल करा

**आसाम, सिक्कीम, राजस्थान, कर्नाटक विद्यापीठातून पदव्या, पदवी, डिप्लोमा घेऊन वरिष्ठ पदावर पदोन्नती घेतलेल्या पूर्वीच्या कर्मचार्यांच्या चौकशी वा कोणतीही कारवाई केलेली नाही. आयुक्त अशा बोगस प्रमाणपत्र सादर करणार्यांना पाठीशी घालत आहे. ही महापालिका प्रशासनाची फसवणूक आहे. संबंधित कर्मचार्यांवर तात्काळ कारवाई करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावेत, अशी तक्रार आपचे युवा आघाडीचे शहराध्यक्ष रविराज काळे यांनी केली आहे.**

## बावधन येथे स्टुडिओला भीषण आग





**पुणे । प्रतिनिधी**

बावधन येथील शिंदेनगर परिसरातील एका इमारतीच्या बाजूला असलेल्या फोटो स्टुडिओला रविवारी (दि. ८) सायंकाळी भीषण आग लागली. अग्निशमन दलाच्या पाच गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि पाण्याचे फवारे मारून आग आटोक्यात आली. या वेळी आग आणि धूर यामुळे इमारतीतील नागरिकांना गुदमरल्यासारखे झाले. त्यांना जवानांनी तात्काळ बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले.

सायंकाळी सहाच्या सुमारास शिंदेनगर येथील एका दुकानाला आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळताच अग्निशमन दलाच्या ५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. कोथरूड, वारजे, पाषाण, औंध, एरंडवणा अग्निशमन केंद्रांतून गाड्या घटनास्थळी घटनास्थळी पोहोचल्या. इमारतीच्या बाजूला असलेल्या स्नॅप आर्ट न्ड फोटो स्टुडिओला ही आग लागली होती. स्टुडिओमध्ये फ्लेक्स, फोटो फ्रेम व इतर साहित्य होते. त्यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले होते. या आगीत स्टुडिओमधील साहित्य जळून खाक झाले. स्टुडिओच्या बाजूलाच असलेल्या तीन सदनिकांना आगीची झळ बसली. त्यामध्ये एक महिला धुरामुळे बेशुध्द पडली. तिला जवानांनी बाहेर काढून उपचारासाठी रुग्णवाहिकेतून पाठवून दिले, तर अन्य सहा नागरिकांना धुरातून बाहेर काढून प्राथमिक उपचारासाठी रुग्णालयात पाठविल्याची माहिती अग्निशमन अधिकारी गजानन पाथरूडकर यांनी दिली. आतमध्ये कोणीही नाही, याची खात्री झाल्यावर जवानांनी चारही बाजूने आगीवर पाण्याचा मारा करून काही वेळात आगीवर नियंत्रण मिळविले. त्यानंतर कुलिंग करण्यात आले. दरम्यान, आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. या स्टुडिओला लागून एक इमारत आहे, तर हाकेच्या अंतरावरच पेट्रोल पंप असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

## योगा पार्कचे काम अंतिम टप्प्यात



**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथे बनविण्यात येणाऱ्या योगा पार्कचे काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच लोकार्पण होणार आहे, अशी माहिती माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी दिली. पिंपळे सौदागर , रहाटणी प्रभागातील विकास कामाची पाहणी माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील व इतर अधिकाऱ्यांनी केली.

नागरिकांसाठी विविध सोयी सुविधायुक्त असे योगा पार्क साकारण्यात येत आहे, यामध्ये १८ मीटर उंचीची बोल्डरिंग वॉल, २१ मीटर स्पीड वॉल, २१ मीटर लीड वॉल, लहान मुलासाठी विविध खेळणी प्रकार, ज्येष्ठांसाठी बैठक व्यवस्था, स्वतंत्र योगा व्यायामासाठी व्यवस्था, वॉकिंग ट्रॅक, प्रशस्त गार्डन व्यवस्था बनविण्यात आली आहे. या योगा पार्क मध्ये बनविण्यात आलेली क्लायबिंग वॉल ही अशिया मधील सर्वात मोठी वॉल आहे. या वॉल मध्ये सराव करणारे मुले ही नॅशनल लेवल स्तरावर खेळतील अशी अपेक्षा नाना काटे यांनी यावेळी व्यक्त केली. या पाहणीवेळी शहर अभियंता मकरंद निकम, स्मार्ट सिटीचे सहशहर अभियंता मनोज सेठीया, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता माणिक चव्हाण, उद्यान विभागाचे उपअभियंता गोसावी, शिर्के कंपनीचे लावंड, स्वामी, जाधव, शिखर संघटनेचे पश्चिम महाराष्ट्राचे सरचिटणीस श्रीकृष्ण कडुसकर, व इतर सहकारी उपस्थित होते.

## भाजपने माझी फसवणूक केली, मला किमान २०० मतं मिळायला हवी होती'; अभिजित बिचुकले संतापले

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या छप्परफाड यशानंतर ईव्हीएमवरुन अनेक सवाल उपस्थित केले जात आहे. विरोधकांनीही हा मुद्दा उचलून धरला आहे. विधानसभा निवडणुकीत ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करीत आज महाविकास आघाडीने मारकडवाडीत सभा घेतली. दरम्यान या प्रकरणात आता बिग बॉस फेम अभिजीत बिचुकलेंनी शंका उपस्थित केली आहे.



अभिजीत बिचुकले यांनी विधानसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. यावेळी त्यांना अवघी ९२ मतं मिळाली होती. मात्र मला किमान २०० मतं अपेक्षित होती, ९२ मतं कशी पडली असा सवाल बिचुकलेंनी उपस्थित केला आहे. मी बारामतीत गेलो तेव्हा कित्येक लोक माझ्यासोबत फोटो काढण्यासाठी गर्दी करतात. त्यामुळे हजारांपैकी केवळ २०० मतं तरी मिळायला हवी होती असं सांगत विधानसभेत ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याचा आरोप बिचुकलेंनी केला आहे. 'ईव्हीएम' विरोधात शरद पवार जर लढा उभारणार असतील तर त्यांच्यासोबत या ईव्हीएम लढ्यामध्ये मी सामील असेन, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

## सोसायटीतील मांजरे जंगलात सोडण्यासाठी फंड मंजूर केल्याप्रकरणी चेअरमनसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

सोसायटीच्या आवारातील तीन मांजरे दुसऱ्या ठिकाणी(रिलोकेटेड) सोडण्यासाठी सोसायटीच्या फंडातून २४०० मंजुर केल्याप्रकरणी सोसायटीच्या चेअरमनसह चौघांविरुध्द वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याप्रकरणी प्राणीप्रेमी कार्यकर्तो मोनिका छेत्री (३०,रा.लोहगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनूसार एक महिला,शेख, अर्जुन प्रसार, चेअरमन लोखंडवाला (सर्व रा. गंगामेल सोसायटी, सोपानबाग) यांच्याविरुध्द प्राणीक्रुरता अधिनियम १९६० चे कलम ११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार फिर्यादी व्हॉटसअपवर चॅटींग चेक करत असताना, त्यांना एक मेसेज आला. त्यामध्ये सोसायटीच्या आवारात असणारी तीन मांजरे सोसायटीच्या सदस्यांनी पंधरा किलोमीटर लांब जंगलात सोडून दिली आहेत. यासाठी एका व्यक्तीस प्रत्येकी मांजरामागे ८०० रुपये दिले आहेत. त्यांना पोत्यात भरुन निर्दयपणे रिलोकेटेड करण्यात आली आहेत. त्यांनी याची खातरजमा केल्यावर सोसायटीचे चेअरमन लोखंडवाला यांनी सोसायटीच्या फंडातून २४०० रुपये मंजुर केल्याची माहिती मिळाली. त्यानूसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक इनामदार करत आहेत.

## आळंदीत समाधीवर पाणी घालत भाविकांकडून माऊलींचा थकवा दूर

पुणे । प्रतिनिधी

पीठसाखर,लिंबु आणि गरम पाण्याची धार घालत माउलींचा कार्तिकी वारीतील शिनवटा घालवण्यासाठी भाविकांनी माऊली मंदिरात गर्दी केली होती. मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीला परंपरेनुसार संत.ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीवर सकाळी भाविकांच्या प्रशाळपूजा संपन्न झाल्या.त्यानंतर देवस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप यांचे हस्ते पवमान अभिषेकपूजा करण्यात आली. मानकऱ्यांना देवस्थानच्या वतीने नारळ प्रसाद वाटप करण्यात आले.

संत.ज्ञानेश्वर महाराजांचा यंदा संजीवन समाधी सोहळा संपन्न झाला. हा सोहळा अमवास्ये पर्यंत चालत असतो त्यांनंतर सात दिवसांनी प्रशाळ पूजा पार पडत असते. यावेळी भाविक समाधीवर पाणी घालत माऊलींचा एक प्रकारे थकवा घालवत असतात यासाठी आवर्जून भाविक आळंदीत येत असतात. कार्तिकीत अनेक भाविकांना माऊलींच्या मुखदर्शनावर समादान मानावे लागते. प्रशाळ पूजे निमित्ताने त्यांचे स्पर्शदर्शन झाल्याने एक प्रकारचे समादान भाविकांच्या नजरेत यावेळी दिसून येत होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतपत्रिकेचा वापर करावा-सुळेंची मागणी

पुणे :- विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ईव्हीएम मशिनबाबत लोकांमध्ये नाराजी आणि अस्वस्थता आहे. त्यामुळे राज्यात होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतपत्रिकेचा वापर करावा, अशी आमची सर्वांची मागणी असेल. यासंदर्भात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचेही पत्र आले आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.



पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सुळे बोलत होत्या. त्या म्हणाल्या, ईव्हीएमसंदर्भात इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांची भूमिका एकच आहे. आमदार उत्तमराव जानकर यांनी जी भूमिका घेतली आहे, ती सामान्यांची जनभावना आहे. निवडणुकीच्या निकालानंतर सर्वसामान्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. अमेरिकेसारख्या देशात ईव्हीएम मशिन नाकारली आहे. इतर देश हे यंत्र नाकारून मतपत्रिकेवर मतदार घेतात, मग आपल्या देशातच ईव्हीएमचा हट्ट का, इतरांसारखा बदल आपणही स्वीकारणे गरजेचे आहे.

## ध्वनिवर्धक सुरू ठेवल्याने दोन हॉटेल मालकांवर गुन्हे

पुणे : पोलिसांचा आदेश धुडकावून हॉटेलमध्ये मध्यरात्रीपर्यंत ध्वनिवर्धक सुरू ठेवल्याप्रकरणी येरवडा पोलिसांनी कल्याणीनगरमधील दोन हॉटेलमालकांवर गुन्हे दाखल केले. 'कुकू' आणि 'ओ आय ब्रू' या हॉटेलांच्या व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पोलिस कर्मचारी प्रवीण खाटमोडे यांनी फिर्याद दिली. गुरुवारी मध्यरात्री पोलिसांनी कुकू हॉटेलवर छापा टाकला. त्या वेळी ध्वनिवर्धक बेकायदा सुरू असल्याचे आढळले. तेव्हा तेथे ४८ ग्राहक होते. पोलिसांनी हॉटेल मालक खुशबू वर्मा आणि व्यवस्थापक फैयाज फकीरउद्दीन मीर (वय ३२) यांच्यावर गुन्हा दाखल केला. 'ओ आय ब्रू' हॉटेलमध्ये याच कारणास्तव कारवाई करण्यात आली. तेव्हा तेथे २५ ते ३० ग्राहक होते. याप्रकरणी हॉटेलचे मालक अमन प्रेम तलरेजा (वय ३०, रा. कोरेगाव पार्क), व्यवस्थापक निखिल बेडेकर (वय ३६, मुंढवा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पोर्शे प्रकरणानंतर मध्यरात्रीपर्यंत सुरू राहणारी हॉटेल, पबविरुद्ध नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. पोलिस, उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करून वीसहून जास्त पबच्या मालकांवर कारवाई केली होती. त्यानंतर या भागातील हॉटेल, पब पुन्हा मध्यरात्रीपर्यंत सुरू राहात असल्याचे आढळले आहे.

## 'मनपसंद गीत'ने जिंकले रसिकांचे मन

पुणे : सुमधुर 'मनपसंद गीत' हा सदाबहार गीतांचा कार्यक्रम पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे येथे नुकताच आयोजित करण्यात आला होता.

गायिका मोनाली दुबे यांच्यासह सर्व सहभागी कलावंतांनी बहारदार गीते सादर करत उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये आकाश सोळंकी, अविनाश झळकी, श्रीराम जोशी, ज्ञानेश्वर वाडुळकर, दीपक शिरोडकर, प्रफुल्ल नेवाळकर, अमित जहागीरदार, मारुती फदाले, स्वप्नील झळकी, अश्विनी बिरारी, सुषमा वाघ आदी कलावंतांनी एकूण ३४ बहारदार गाणी सादर केली. नागण्णा झळकी यांच्या संकल्पनेतून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आकाश सोळंकी यांच्या निवेदनाने कार्यक्रम रंगतदार झाला. कार्यक्रमाला विक्रम क्रिएशन, अमोल कोळेकर यांचे तंत्रसहाय्य तर एस. आर. निर्मिती यांचे सहकार्य लाभले.